दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री
www.rashtrasahyadri.com

## आशिया कप :
### मोहसीनकडून ट्रॉफी स्वीकारणार नाही

प्रचंड विरोधानंतर आशिया चषकाचा भारत-पाकिस्तान झाला. भारताने हा सामना जिंकला. परंतु पाकिस्तानी खेळाडूंची हस्तांदोलन टाळत दहशतवादी हल्ल्या विरोधातील आपला निषेध व्यक्त केला. आशियाई क्रिकेट परिषदेचं अध्यक्षपद पाकिस्तानचे मोहसीन नकवीकडे आहे. जर कोणत्याही संघाने आशिया चषकाचा अंतिम सामना जिंकल्यास मोहसीन नकवीकडून ट्रॉफी दिली जाईल. हे सगळं पाहता सूर्यकुमार यादवने आम्ही मोहसीन नकवीकडून ट्रॉफी स्वीकारणार नाही, असे मत सूर्यकुमार यादवने आशियाई क्रिकेट परिषदेला ठणकावून सांगितले आहे. त्यामुळे आता आशियाई क्रिकेट परिषद कोणता निर्णय घेणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.



● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक ३३६ ● बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ ● पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

# निवडणुका पुन्हा लांबणीवर..
## मुदतवाढीच्या मागणीला सुप्रीम कोर्टाची मंजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मागील तीन वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर गेल्या आहेत. या रखडलेल्या निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढीसंबंधित मागणी करणारा अर्ज सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला होता. आज मंगळवारी या अर्जावर सुनावणी होऊन निवडणूक आयोगाने केलेल्या या मागणीला न्यायालयाने मंजुरी दिली. यात सुप्रीम कोर्टाने निवडणुकींसाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र ३१ जानेवारीनंतर पुन्हा मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे.



सुप्रीम कोर्टाने ४ आठवड्यात निवडणुका जाहीर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर आता राज्य निवडणूक आयोगाने हा अर्ज केला. ओबीसी आरक्षणांच्या मुद्यासह इतर अनेक कारणांमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रखडल्या गेल्या. निवडणुकांना दिलेली स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने उठवली. चार महिन्यांच्या आत म्हणजेच ऑक्टोबर २०२५ पर्यंत निवडणुकांशी निगडीत प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश न्यायालयाने निवडणूक आयोगाला मे महिन्यात दिले होते. त्याप्रमाणे, आयोगाने प्रभाग पुनर्चना, आरक्षण, मतदारयाद्या तयार करणे अशी कामे सुरु केली आहेत. पण, ईव्हीएम, सण-उत्सव, कर्मचाऱ्यांची कमतरता अशी कारणं राज्याकडून सादर करण्यात आली. त्यानंतर, सुप्रीम कोर्टाने निवडणुकींसाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या पुढीलवर्षीच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता राज्य सरकारला मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार राज्य सरकारला ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र ही मुदत संपत आली असूनही एकाही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक पार पडली नाही.

यासंदर्भात आज मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने राज्य सरकारला निवडणूक प्रक्रियेत एवढा उशीर का? असा जाब विचारला. तेव्हा राज्य सरकारने आपली बाजू मांडली. त्यानंतर न्यायालयाने राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता ३१ जानेवारीपर्यंत राज्य निवडणूक आयोगाला सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेऊन त्यांचा निकालही जाहीर करावा लागेल.

# महाराष्ट्रात पावसाचे थैमान!
## अतिवृष्टीमुळे ३० जिल्ह्यांत ४२ लाख ८४ हजार एकर पिके पाण्यात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर (४२ लाख ८४ हजार ८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.

ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यातले पंचनामे पूर्ण होऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्रांच्या पंचनाम्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असून लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना सुरु आहेत. अशी माहिती कृषिमंत्री **(पान ४ वर)**

### सर्वाधिक नुकसानग्रस्त जिल्हे

नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर), बुलढाणा (८९,७८२ हेक्टर)

### झापुक । zupuk

मिठाई सोडा जिवंत असताना
आई बापाला साधा दिला
नाही पाव
आता मेल्यावर पित्राला
मोठे पणासाठी गोड-धोड
करून जेवू घालतो सारा गाव

नवनाथ कुताळ,
9422231825

# नविन एनिमेशन, गेमिंग धोरणाला मंजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ बैठकीत नविन एनिमेशन आणि गेमिंग धोरणाला मंजुरी देण्यात आली. तसेच मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्ता तसेच विद्यार्थीनीसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने वाढ करण्याचा निर्णयही मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली (१६ सप्टेंबर) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. उद्योग विभागाने महाराष्ट्र निमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिलिटी धोरण २०२५ जाहीर केले. तसेच सन २०५० पर्यंतचे नियोजन मांडत सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा आराखडा मंत्रिमंडळाने मंजूर केला.

अकोला येथील दि निळकंठ सहकारी सूतगिरणीला खास बाब म्हणून शासन अर्थसहाय मिळणार असल्याचे वस्त्रोद्योग विभागाने जाहीर केले. अर्थसहाय्याच्या ५:४५:५० या गुणोत्तरानुसार निवड करण्यात येणार आहे. मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्ता तसेच विद्यार्थीनीसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने



वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने हजारो विद्यार्थी- विद्यार्थिनींना दिलासा मिळणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस पुढील दोन वर्षांसाठी मुदतवाढ मिळाली. राज्यभरात ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी, व अस्तित्वातील भवनांच्या दुरूस्तीसाठी असा एकूण १३२ कोटी ४८ लाखांचा खर्च अपेक्षित आहे. विविध ठिकाणी ७९ नवीन शेतकरी भवन उभारण्याचे प्रस्ताव सहकार व पणन विभागाने

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय : विद्यार्थीनीसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात दुपटीने वाढ

दिला आहे. तसेच आधुनिक संत्रा केंद्र उभारण्याच्या योजनेस २ वर्षे मुदतवाढ देण्यात आली. नागपूर, काटोल, कळमेश्वर, (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती ) व संग्रामपूर, (जि.बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा केंद्र उभारण्यात येत आहेत.

भंडारा ते गडचिरोली दरम्यान ९४ किलोमीटरचा द्रुतगती महामार्ग करणे, प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या आखणीस व भूसंपादनास मान्यता दिली. भुसंपादनासह अनुषंगिक ९३१ कोटी १५ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता मिळाली. ऊर्जा विभागाने नवीनकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी संयुक्त उद्यम कंपनी महानिर्मिती व मे. सतलज जलविद्युत निगम लि. यांची संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करण्यास मान्यता दिली. राज्यभरात ५ हजार मेगावॅट क्षमतचे प्रकल्प विकसित करणार आहे. राज्याच्या पायाभूत सुविधा उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा दर्जा देण्यात आला. राज्यातील पायाभूत प्रकल्पांबाबत यापुढे उपसमिती यापुढे मंत्रिमंडळ समिती म्हणून कामकाज करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## महत्वाचे...

### गुगल जेमिनीचा धोका, व्हायरल ट्रेंडमुळे ओढावू शकते संकट

**मुंबई :** गुगल जेमिनीचा 'नॅनो बनाना' ३ऊफिगरिनचा ट्रेंड सध्या सोशल मीडियावर प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहे. इन्स्टावर सध्या सरासरी दर तिसरी व्यक्ती आपले रेट्रो लूकमधील फोटो शेअर करताना दिसत आहे. या ट्रेंडला 'घिब्ली' ट्रेंडपेक्षाही अधिक लोकप्रियता मिळाली आहे. मात्र, एआय (ख) प्लॅटफॉर्मवर वैयक्तिक फोटो अपलोड करण्याच्या धोक्यांबाबत तज्ज्ञांनी इशारा दिला आहे. यामुळे डिजिटल गोपनीयतेची, विशेषतः आपला चेहरा ज्यात स्पष्ट दिसतो अशा फोटोंबद्दलची चिंता वाढत आहे. 'डीपस्ट्रॅट' चे मुख्य कार्यकारी अधिकारी सायबरसुरक्षा तज्ज्ञ सैकात दत्ता यांनी स्पष्ट केले, जेव्हा तुम्ही तुमचा चेहरा स्पष्ट दिसत असलेला फोटो अपलोड करता, तेव्हा ओळख व्यवस्थापन म्हणजेच आयडेंटीटी मॅनेजमेंटकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तो प्लॅटफॉर्म तुमच्या डेटावर प्रक्रिया करण्यासाठी, विश्लेषणासाठी तो माहिती साठवू शकतो. जरी माहिती अनामित केली असली, तरी तुमचा डेटा तुम्ही न इच्छिलेल्या पद्धतीने वापरला जाण्याची शक्यता असते.

### अतिवृष्टीमुळे दोन महिलांचा मृत्यू

**जालना :** जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमध्ये दोन महिलांचा मृत्यू झाला आहे, तर एक जण जखमी झाली आहे. जालना शहरात भिंत कोसळून ६० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. तर बदनापूर तालुक्यातील देवपिंपळगाव गावात ६५वर्षीय महिला वाहून गेली आहे. सुमन गुडेकर आणि शारदाबाई शिरीसुंदर असे मृत वृद्ध महिलांची नावे आहेत. अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी याबाबतची माहिती दिली आहे. जालना शहर तालुका आणि अंबड घनसावंगी तालुक्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान झाल असून त्याचबरोबर जीवितहानी देखील झालीय, जालना शहरातील चमडा बाजार परिसरामध्ये भिंत अंगावरती कोसळून सुमन घोडेकर या ६० वर्षीय महिलेचा मृत्यू झालाय तर बदनापूर तालुक्यातल्या देवपिंपळगाव गावात ६५ वर्षीय महिला शारदाबाई शिरीसुंदर ही महिला पाण्यात वाहून गेली आहे. या महिलेचा मृतदेह अजूनही हाती लागला नसून एनडीआरएफच्या टीमकडून पाहणी सुरू आहे.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या
# अध्यक्षाला मंत्रिपदाचा दर्जा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील ब्राह्मण समाजातील आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षांना आता मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य सरकारने याबाबत निर्णय घेतला. त्यामुळे परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांना मंत्रिपदाचा दर्जा मिळणार आहे.



गेल्या वर्षी, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना परशुराम आर्थिक विकास महामंडळाला मंजुरी देण्यात आली होती. ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षण, व्यवसाय उभारणी आणि अन्य सहाय्यता देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने हा निर्णय घेतला होता. ५० कोटी रुपये या महामंडळाचे भाग भांडवल आहे. परशुराम आर्थिक विकास महामंडळ अध्यक्षाला मंत्रिपदाचा दर्जा दिल्याने ठाणे जिल्ह्याला आणखी एक नवा मंत्री मिळाला आहे. शिवसेना आणि भाजप पाठोपाठ आता राष्ट्रवादी काँग्रेसलाही ठाण्यात मंत्रिपद मिळालं आहे.

गेल्या वर्षी, सप्टेंबर महिन्यात राज्य सरकारने परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. ब्राह्मण समाजाने अनेक वर्षांपासून स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली होती. ती मागणी मान्य करण्यात आली होती.

# तुम्ही ब्रँड नाही, बाळासाहेब होते..
## फडणवीसांचा ठाकरे बंधूंना टोला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत काही लोक म्हणत होते की त्यांच्याकडे ब्रँड आहे, पण आमच्या प्रसाद लाड आणि शशांक राव यांनी त्यांच्या ब्रँडचा बँड वाजवला. बाळासाहेब ठाकरे हे खरे ब्रँड होते, तुम्ही नाहीत अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर केली.



आमच्याकडे चहा विकणारा जागतिक ब्रँड झाला, नरेंद्र मोदी हा जगातला सर्वात मोठा ब्रँड आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईतील भाजपच्या विजयी संकल्प मेळाव्यात मुख्यमंत्री बोलत होते.

अमित साटम यांनी ब्राह्मोस मिसाईल सारखा विरोधकांवर हल्ला चढविला. आपल्याला कोणी आता थांबवू शकत नाही. मागच्या वेळी थोडक्याने वाचलो होतो, दोनच नगरसेवक कमी पडले होते. आपल्याला माहिती आहे की कमी पडल्यावर काय करायचे ते. त्यामुळे यावेळी मुंबई महापालिकेमध्ये महायुतीच जिंकणार, महापौर महायुतीचाच असणार असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी ठाकरे बंधूंवर टीका केली. ते म्हणाले की, साधी बेस्टची निवडणूक होती. आम्ही म्हणालो कशाला पक्षावर लढायचं. तर ते म्हणाले आमचा ब्रँड आहे. आमचे शंशाक राव आणि प्रसाद लाड, दरेकर यांनी या ब्रँडचा बँड वाजवला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ब्रँड आहे, तुम्ही ब्रँड नाही.

आमच्याकडे अमित साटम सारखा सामान्य कार्यकर्ता अध्यक्ष होतो. आमच्याकडे चहा विकणारा जागतिक ब्रँड झाला. नरेंद्र मोदी नावाचा जगातील सर्वात मोठा ब्रँड आमच्याकडे आहे.

# सव्वा लाख लाडक्या बहिणी अपात्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'मुळे महिलांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण होईल अशी अपेक्षा होती. मात्र आता या योजनेतून राज्यातील सुमारे सव्वा लाखांहून अधिक महिलांना अपात्र ठरवण्यात आलं आहे.

सरकारच्या निर्णयामुळे अनेकांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. लाखो लाडक्या बहिणींना सरकारने मोठा झटका दिला आहे. अपात्र महिलांची मोठी यादी जाहीर केली आहे. लाडकी बहीण योजनेसंदर्भातली आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई समजली जात आहे. खोटी माहिती, बनावट दस्तऐवज आणि नियमभंग केल्यामुळे प्रशासनाने मोठा सर्व्हे करून एकाच झटक्यात लाखो महिलांना या योजनेतून बाहेरचा रस्ता दाखवला आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना असून २१ ते ६० वयोगटातील महिलांना दरमहा १५०० रुपयांचं आर्थिक सहाय्य दिलं जातं. परंतु या योजनेत अनेक महिलांनी वय, कुटुंबातील सदस्यांची संख्या आणि अन्य अटींचा भंग करत अनधिकृत लाभ घेतल्याची माहिती समोर आली आहे. योजनेतील अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेण्यासाठी सरकारने संपूर्ण राज्यात सर्वेक्षण सुरू केलं. यासाठी तब्बल ६-७ लाख अंगणवाडी सेविकांना कामाला लावण्यात आलं. त्यांनी गावागावात, घराघरात जाऊन लाभार्थी महिलांची माहिती गोळा केली आणि लबाड लाडक्या बहीणींचा शोध घेवून त्यांना थेट अपात्र ठरवण्यात आलं आहे.

पहिल्या टप्प्यात ६५ वर्षांपेक्षा जास्त आणि २१ वर्षांखालील महिलांनी लाभ घेतला आहे का, याची तपासणी करण्यात आली. या सर्वेक्षणात एकूण १,३३,३३५ अर्ज तपासण्यात आले. त्यापैकी ९३,००७ अर्ज पात्र तर ४०२२८ अर्ज अपात्र ठरले. हे सर्वेक्षण मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये करण्यात आलं. त्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्याचा समावेश आहे.

दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक घरातून जास्तीत जास्त दोन महिलांनीच लाभ घ्यावा, हा नियम तपासण्यात आला. यासाठी एकूण ४०९०७२ अर्ज तपासण्यात आले. ३२४३६३ अर्ज पात्र तर ८४७०९ अर्ज अपात्र ठरले.

या दोन्ही टप्प्यांत मिळून १२४९३७ महिलांना लाडकी बहीण योजनेतून अपात्र ठरवण्यात आलं आहे. जिल्हा व महिला बालविकास अधिकारी गणेश पुंगळे यांनी ही माहिती दिली आहे. संबंधित माहिती शासनाला सादर करण्यात आली असून, अधिकृत आकडेवारीनुसार ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे. **(पान ४ वर)**

### लाडक्या बहिणी संतापल्या...

प्रशासनाच्या या निर्णयामुळे अपात्र ठरलेल्या महिलांकडून मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे. नावे अचानक योजनेतून वगळण्यात आली, त्या सध्या महिला व बाल विकास कार्यालयांच्या उंबरठ्यावर हेलपाटे मारत आहेत. आम्हाला योजनेतून नाव वगळण्यात येणार आहे, याची कुठलीही पूर्वसूचना दिली नाही, असा आरोप अनेक महिलांनी केला आहे.



## संपादकीय..

# साहित्यिकांचा राजकीय आखाडा

मराठी साहित्याच्या इतिहासात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. दरवर्षी लाखो वाचक, लेखक आणि विद्वन यांचा सहभाग असलेले हे संमेलन साहित्याच्या उत्क्रांतीचे प्रतिबिंब असावे, अशी अपेक्षा आहे. मात्र, गेल्या काही दशकांत हे संमेलन वादांच्या भोवऱ्यात सापडले आहे. आगामी संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील यांची निवड झाल्यापासून पुन्हा एकदा हा वाद चव्हाट्यावर आला आहे.

समाजातून उमटलेल्या विविध प्रतिक्रिया, त्यांच्यातील काहींच्या बुद्धीवर आक्षेप घेणाऱ्या टीकांचा सामना करताना पाटील यांनी पुण्यातील एका सत्कार समारंभात दिलेले उत्तर – ‘‘छत्रपती संभाजी महाराजांवरील 'संभाजी' ही कादंबरी मी घरा–घरा पोहोचवली आहे. लिखाण करून–करून माझे हात वाकडे झाले आहेत‘‘ – हे केवळ वैयक्तिक प्रतिकार नव्हे, तर मराठी साहित्यातील अंतर्गत राजकारणाचे एक सूक्ष्म दर्शन आहे. या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यातील राजकारणाचा आढावा घेणे आवश्यक झाले आहे.

साहित्य संमेलनाची सुरुवात १८७५ मध्ये झाली आणि सुरुवातीला ते साहित्याच्या प्रचार–प्रसारासाठीचे निष्कलंक व्यासपीठ होते. मात्र, स्वातंत्र्यानंतरच्या काळात, विशेषत: १९७० च्या दशकापासून, अध्यक्षपदाची निवड ही साहित्यिक गुणवत्तेपेक्षा राजकीय, सामाजिक आणि वैचारिक गटबाजीशी जोडली गेली. दरवर्षी अध्यक्षपदाचा मुद्दा गाजतो, कारण तो केवळ सन्मान नव्हे, तर साहित्यिक क्षेत्रातील प्रभाव आणि दिशा ठरवणारा होता. मराठी साहित्यातील राजकारण हे बहुआयामी आहे – ते जातीय, प्रादेशिक, वैचारिक आणि आर्थिक घटकांनी विणलेले आहे. उदाहरणार्थ, ब्राह्मणवादी साहित्यिक परंपरेविरोधात दलित–बहुजन चळवळीचा उदय झाल्यापासून अध्यक्षपदाच्या निवडीत जातीचा मुद्दा नेहमीच उपस्थित राहिला आहे. कधी कधी विद्वन लेखकांना बाजूला सारून लोकप्रिय लेखक किंवा राजकीय नेत्यांना प्राधान्य दिले जाते, ज्यामुळे साहित्याची शुद्धता धोक्यात येते.विश्वास पाटील यांच्या निवडीचा वाद हा या राजकारणाचा एक ताजा अध्याय आहे. पाटील हे 'संभाजी', 'पानिपत' सारख्या कादंबऱ्यांसाठी ओळखले जाणारे लेखक आहेत, ज्यांनी ऐतिहासिक कथानकांना सामान्य वाचकांपर्यंत नेले. त्यांच्या 'संभाजी'ने छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनाला नवे आयाम दिले आणि लाखो प्रती विकल्या गेल्या. मात्र, काही टीकाकारांनी त्यांच्या बुद्धीवर आक्षेप घेतला – कदाचित त्यांच्या साहित्यिक शैलीला 'व्यावसायिक' म्हणून खोडून काढण्यासाठी. हे आक्षेप केवळ वैयक्तिक नसून, मराठी साहित्यातील 'उच्च' आणि 'निम्न' साहित्याच्या भेदभावाचे लक्षण आहे. एकीकडे प्रगल्भ साहित्यिक गट 'शुद्ध' साहित्याची बाजू घेतात, तर दुसरीकडे लोकप्रिय साहित्याला राजकीय फायदा घेण्यासाठी वापरले जाते. संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड ही प्रक्रिया पारदर्शक नसल्याने, नेहमीच षड्यंत्राच्या अफवा उडतात. कधी कधी राजकीय पक्षांचे हस्तक्षेप, कधी साहित्यिक संघटनांचे अंतर्गत कलह – हे सर्व साहित्याच्या उद्दिष्टापासून दूर नेते.मराठी साहित्यातील हे राजकारण केवळ अध्यक्षपदापुरते मर्यादित नाही. प्रकाशन क्षेत्रातील एकाधिकार, पुरस्कार वितरणातील पक्षपात, आणि आता डिजिटल युगात सोशल मीडियावरील ट्रोलिंग – हे सर्व साहित्यिक वातावरणाला दूषित करत आहेत. उदाहरणार्थ, दलित साहित्यिकांच्या उदयाने मुख्यधारा साहित्याला आव्हान दिले, पण त्याचा परिणाम म्हणजे साहित्यिक संमेलनांमध्ये वैचारिक द्वंद्व वाढले. मराठी साहित्य हे मराठी अस्मितेचे प्रतिनिधित्व करते, तरीही ते जातीय राजकारणाच्या जाळ्यात अडकले आहे. विश्वास पाटील यांचे वक्तव्य हे साहित्यिक संघर्षाचे प्रतीक आहे – ते म्हणतात, ‘‘माझे हात वाकडे झाले आहेत‘‘, जे केवळ शारीरिक श्रमाचे वर्णन नव्हे, तर साहित्यिक जीवनातील संघर्षाचे रूपक आहे. हे वक्तव्य साहित्याच्या लोकशाहीकरणाची बाजू घेते, ज्यात प्रत्येक लेखकाला त्याच्या योगदानानुसार मान्यता मिळावी.या राजकारणाचा परिणाम साहित्याच्या गुणवत्तेवर होतो. दरवर्षी वादग्रस्त अध्यक्षपदामुळे संमेलनाचे उद्दिष्ट – साहित्यिक चर्चा, नव्या लेखकांचा उदय – मागे पडते. साहित्यिक क्षेत्रातील नेते म्हणून अध्यक्षाने एकत्रितपणे साहित्याला मजबूत करावे, पण प्रत्यक्षात तो गटबाजीचा शिकार होतो. यावर उपाय म्हणजे निवड प्रक्रियेला अधिक पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित करणे. साहित्यिक संघटनांनी राजकारणापासून दूर राहून, विविधता आणि समावेशकतेची भूमिका घ्यावी. विश्वास पाटील यांच्या निवडीने हा मुद्दा पुन्हा उपस्थित झाला आहे – आता वेळ आहे की मराठी साहित्य राजकारणाच्या छायेतून बाहेर पडून खऱ्या उजेडात येईल. मराठी साहित्य हे आमचे सांस्कृतिक वारसा आहे. ते वादांमध्ये गुंतून पडण्याऐवजी प्रेरणादायी राहील यासाठी सर्वांनी जबाबदारी घ्यावी. अन्यथा, संमेलनासारखी व्यासपीठेही फक्त राजकीय आखाडा बनतील.

# शिक्षकांनी प्रामाणिक काम केल्यास शाळेची प्रगती : मोरे महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी योग्य समन्वय ठेवून प्रामाणिकपणे काम केल्यास शिाळेची प्रगती होते. ग्रामस्थांनी एक विचाराने शाळेच्या विकासात सहकार्य केले तर गावाचा नावलौकिक होईल, असे मत भगवान महाराज मोरे (देहूकर) यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांदुळवाडी येथे शाळेतून बदली झालेले शिक्षक उज्वला खेडकर, प्रभुजी बाचकर, कल्याणी खराडे यांना निरोप व नव्याने हजर झालेल्या मुख्याध्यापिका संगीता बेद्रे, शिक्षक रमेश घोडके यांच्या स्वागत समारंभाते ते बोलत होते. .रोहिणी खडके यांची अंगणवाडी मदतनीस म्हणून, जयश्री पेरणे यांना अंगणवाडी सेविका म्हणून बढती मिळाल्याबद्दल, तसेचवैष्णवी



खाटेकर यांची शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षपदी वकावेरी निकम यांची सदस्य पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी मोहन खाटेकर होते.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पत्रकार विनीत धसाळ यांनी प्रास्तविक केले. तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाळासाहेब पेरणे, सेवा संस्थेचे सदस्य अविनाश पेरणे व सत्कार झालेल्या शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते शिक्षक व इतरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सेवा संस्थेचे अध्यक्ष रेवणनाथ पेरणे, आबासाहेब पेरणे, रघुनाथ हंडाळ, तात्यासाहेब धागुडे, कानिफनाथ धसाळ, सुखदेव खाटेकर, अशोक तोडमल, रेवणनाथ खडके, प्रवीण धसाळ, शिवाजी खडके, मच्छिंद्र चव्हाण, शंकर गोपीनाथ पेरणे, अर्जुन धसाळ, स्वप्निल पेरणे, संजय धागुडे, विक्रम तागड, अरुण धसाळ, प्रसाद धागुडे, नितीन निकम, सिध्दार्थ पेरणे, प्रमोद खडके, रावसाहेब खडके, गोरख मोरे, अविनाश गोरख पेरणे, बबन कोकाटे आदींसह शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सातारा हिल मॅरेथॉनमध्ये दविंदरसिंग धुप्पड यांना सुवर्णपदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महाराष्ट्रातील सर्वात कठीण हाफ मॅरेथॉन म्हणून ख्याती असलेल्या सातारा हिल मॅरेथॉनमध्ये श्रीरामपूर रनिंग क्लबचे दविंदरसिंग धुप्पड यांनी २१.१ किमी अंतर केवळ १ तास ५७ मिनिटांत पूर्ण करून सुवर्णपदकाची कमाई केली.४५० मीटर इलीव्हेशन गेन असलेला घाट पार करताना धुप्पड यांनी दाखवलेले सामर्थ्य व चिकाटी पाहून उपस्थितांनी कौतुकाचा वर्षाव केला. या यशामुळे धुप्पड यांना हिल चॅम्पियन म्हणून गौरवण्यात आले. धुप्पड यांना पुण्याच्या रनअहोलिक्स ग्रुपचे संस्थापक आयर्नमॅन डॉ. योगेश सातव यांचे मार्गदर्शन लाभले. मागील तीन महिन्यांपासून चंदनापुरी घाट, गोरक्षनाथ गढ



यांसारख्या कठीण चढ–उताराच्या ठिकाणी घेतलेल्या सरावाचा फायदा त्यांना या स्पर्धेत झाला. कौटुंबिक वेळेत काटकसर करून सातत्याने केलेल्या तयारीचे फळ सुवर्णपदकाच्या रूपाने मिळाल्याचे धुप्पड यांनी सांगितले. या यशात त्यांच्या आई व पत्नीचे पाठबळ मोलाचे ठरले.

श्रीरामपूरच्या इतर धावपटूंनीही स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. रवींद्र निकम, विशाल कोटक, उमेश भोसले, डॉ. संकेत मुंदडा, विनायक शिंदे, राहुल सागडे यांनी रौप्य पदक मिळवले, तर डॉ. रवींद्र भीटे व रोहित राऊत यांनी कांस्य पदक जिंकून श्रीरामपूरचे नाव उंचावले. पत्रकार रावसाहेब साठे, डॉ. समीर बडाख, विपुल कोटक, गणेश देशपांडे, संजय भिसे यांच्यासह रनिंग व सायकलिंग क्लबच्या सर्व सदस्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत श्रीरामपूरकर चमकले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : महाराष्ट्र स्टेट वेटरन्स अक्वाटिक असोसीएशनच्यावतीने दरवर्षी होणारी २६ वी स्टेट लेवल मास्टर्स अक्वाटीक चॅम्पियन स्पर्धा संभाजीनगर येथील सिद्धार्थ जलतरण येथे पार पडली. स्पर्धेत श्रीरामपूरच्या ज्ञानसाई हेल्थ क्लबचे जलतरण प्रशिक्षक राजकुमार यादव यांनी सुवर्ण व ब्राँझ पदक मिळाले. मनोज वाघ यांनी ३ ब्राँझ व मयुरा बनकर यांनी ३ सुवर्णपदक पटकावले.

मदनलाल सोमाणी यांनी २ गोल्ड, १ सिल्वर, १ ब्राँझ, राजेश्वरी पवार ३ गोल्ड, व १ सिल्वर. चांगदेव मोरे १ गोल्ड व २ सिल्वर. मोहन कुकरेजा १ गोल्ड व १ सिल्वर. बलविंदरसिंग चौहान यांनी १ ब्राँझ पदक पटकावले. या सर्वांनी अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व करत मेडल्स पटकावले. ऋषिकेश साळुंके व सुरेश बुधे यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. त्यांच्या या कामगिरीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# फार्मसी व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : येथील अमृतवहिनी फार्मसी इन्स्टिट्यूटमध्ये राज्य फार्मसी परिषद प्रायोजित आणि अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन तसेच संगमनेर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय फार्मसी व्यवस्थापन कार्यशाळा यशस्वीपणे पार पडल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. पी. शिरभाते यांनी दिली.

कार्यशाळेचे उदघाटन राज्य फार्मसी परिषदेचे समन्वयक ओम नारंग, संगमनेर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष महेश अभंग, राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे संघटक सचिव चेतन कर्डीले, अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे संचालक संदेश जाजू, किशोर देशमुख, अतुल चांगले, अजित येवले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. नारंग म्हणाले की, अमृतवाहिनीने अतिशय चांगल्या प्रकारे कार्यशाळा आयोजित केल्याने संगमने मधील फार्मासिस्ट यांना पर्वणीच उपलब्ध झाली आहे. कार्यशाळेत डॉ. राजेंद्र मोगल, महेश जूनघरे या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये विद्यार्थी, फार्मासिस्ट व व्यावसायिक सहभागी झाले होते.

# नेमबाजी स्पर्धेत राजेंद्र पवारला सुवर्णपदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोल्हार** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच क्रीडा व युवक सेना संचालनालय (पुणे) व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने शालेय जिल्हास्तरीय नेमबाजी स्पर्धेत डीकेपी स्कूल अँड रायफल शूटिंग स्पोर्ट्स क्लब लोणी व राहता रायफल असोसिएशनच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्यात आपला ठसा उमटवला आहे. पाच विद्यार्थ्यांनी विविध पदके मिळवली. यश पवारने १४ वर्षे वयोगटात नेमबाजीत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. ईशान खर्डेने द्वितीय क्रमांक मिळवला. सतरा वर्षीय गटात उन्नती वर्पेने सुवर्णपदक मिळवले. अपेक्षा असणारेने रौप्यपदक मिळवले, तर साईशा विखेने कांस्यपदक मिळवले. विजेत्या खेळाडूंना क्लबचे प्रशिक्षक क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दीपक रणपिसे, प्रशिक्षक प्रा. सुशांत शेळके व प्रा. किरण रणपिसे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, सुश्मिमता विखे पाटील यांनी अभिनंदन केले.

# माळवाडगाव शाळेत शिक्षकांना निरोप व स्वागत

## ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याने शिक्षक भावूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांना निरोप व नव्याने आलेल्या शिक्षकांचा स्वागत समारंभ ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब आसने यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याध्यापक देवदास मुंतोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. बदली झालेल्या शिक्षकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सुनील पाचपिंड, मारिया साळवे, संगीता साळवे, तोडमल, बोबडे म यांनी मनोगत व्यक्त केले गावाने व पालकांनी आम्हाला जे प्रेम दिले ते आमच्या नेहमीच स्मरणात राहील, असे त्यांनी सांगितले.

नव्याने रुजू झालेले ठोकळ, गवळी, भालदंड व जाधव यांचाही सत्कार करण्यात आला नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांनी शाळेच्या नावलौकिकात भर टाकण्यासाठी प्रयत्न करावे. ग्रामस्थ व पालकांच नेहमीच




सहकार्य राहील असे आश्वासन पालकांनी व ग्रामस्थांनीदिले. याप्रसंगी भास्करराव आसने, बाळासाहेब हरूळे,सुरेश आसने, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र शेळके, उपाध्यक्ष पत्रकार संदिप आसने, अमोल दांगट, प्रवीण साळवे, मनिषा आसने, राणी गाडे यांनी मनोगत व्यक्त केले. सुदाम आसने, रामकृष्ण आसने, रामनाथ आसने, दीपक आसने, माजी अध्यक्ष जालिंदर आसने, संदिप औटी, संतोष नागले, अशोक दळे, योगेश आसने, सुमन आसने, ललिता उमाप, मनीषा आसने, पूजा आसने, भक्ती आसने, अश्विनी धायगुडे, अर्चना अनुसे, कोमल आसने, माधुरी लटमाळे यांच्यासह ग्रामस्थ व पालक उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक देवदास मुंतोडे यांनी केले. सूत्रसंचालन शपत्रकार संदीप आसने यांनी केले.

# कबड्डी स्पर्धेचे अशोक महाविद्यालयाला जेतेपद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अशोकनगर** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्यावतीने मिरजगाव येथे झालेल्या आंतर महाविद्यालय कबड्डी स्पर्धेत अशोक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यात अशोक महाविद्यालयाने त्रिमूर्ती महाविद्यालयाचा रोमांचक लढतीत पराभव केला व विजेतेपदाची मानकरी ठरले.

राऊत तेजस, साळुंके अभिजित, ओंकार ढाकणे, गणेश मांजरे, आयान शेख, ज्ञानेश उंडे, विशाल ब्राह्मणे, हर्षल देवकर, आकाश पारधे, अजिंक्य पवार, अभिषेक तऱ्हाळ, आकाश पवार यांनी उत्तुंग योगदान दिले. संघाला क्रीडा शिक्षण संचालक डॉ. विवेक साळवे, प्रा.दिलीप साळुंके, माजी खेळाडू गणेश राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंचे भानुदास मुरकुटे, बाबासाहेब आदिक, कोंडीराम उंडे, योगेश विटनोर, सोपानराव राऊत, विरेश गलांडे, मंजुश्री मुरकुटे, निरज मुरकुटे, प्राचार्या डॉ.सुनीता गायकवाड, बाबासाहेब पटारे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# ज्ञानेश्वर माउलींनी जगाला ज्ञानामृत दिले : नवनाथ महाराज म्हस्के

## बदामबाई विद्यालयात पसायदान अभियान कार्यक्रम




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : ग्रंथराज ज्ञानेश्वरी जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघप्रणित सामाजिक समरसता मंचाच्यावतीने येथील कै. सौ. बदामबाई गांधी विद्यालयात आयोजित पसायदान अभियान कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या माध्यमातून ज्ञानेश्वर माउलींनी जगाला ज्ञानामृत दिले असल्याचे प्रतिपादन बाभळेश्वर येथील नवनाथ महाराज म्हस्के यांनी यावेळी केले

संयोजक वसंतराव कदम, अहिल्यानगर जिल्हा मंडळ सदस्या शुभांगी कदम, उमा वहाडणे, सुवर्णा म्हस्के, ॲड. मयुरेश नवले, तालुका सदस्य शाम पवार, मुख्याध्यापक विश्वनाथ नानेकर, माजी विद्यार्थी संघाचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पूजन करण्यात आले. नानेकर यांनी स्वागत केले संयोजक कदम यांनी प्रास्ताविकात ग्रंथराज ज्ञानेश्वरी जयंतीनिमित्ताने १२ ऑक्टोबरपर्यंत पसायदान अभियान राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

ॲड. नवले यांनी विद्यार्थ्यांना समरसता शपथ दिली. नगरपंचायतच्या कर्मचारी उल्हासाबाई चव्हाण व कामगार नेते सनी चव्हाण यांच्या हस्ते माऊलीची आरती करण्यात आली. म्हस्के महाराज म्हणाले की, ज्ञानेश्वर माऊलींनी नेवासा या भूमीतून ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जगाला ज्ञानामृत दिले. आज जगात खांबावर मंदिरे उभारली गेली. मात्र येथे खांबासाठी मंदिर उभारले असून सदरचा खांब हा भक्तांसाठी माऊलींचे मूर्तीमंत रूप आहे. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी शिक्षक संजय चौधरी, अजय आव्हाड, प्रशांत खंडाळे, जनार्दन शिंदे, राजेंद्र नाईक, बाबासाहेब दहातोंडे, सुरेखा चौगुले, लता निकाळे, सुनीता मकासरे, रमेश कुलकर्णी, राजेंद्र पटारे, कृष्णा गवळी, संभाजी गवळी, रामभाऊ शेंडे, यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते

# खेळामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो : डॉ. बडधे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षणाबरोबरच खेळाचाही अधिक वाटा आहे. क्रीडा स्पर्धांमुळे आरोग्य उत्तम राहते. आज क्रीडा क्षेत्रामध्ये नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या असून क्रीडा क्षेत्राकडे पालक शिक्षणाबरोबरच खेळायला प्राधान्य देत आहे. बोरावके महाविद्यालयाचे क्रीडांगण आहे. जागतिक दर्जाचा खेळाडू जहीरखान हाही याच क्रीडांगणावर तयार झालेला आहे. म्हणून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळाला महत्त्वाचे स्थान आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे यांनी

येथील बोरावके कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या मुलींच्या महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य, डॉ. मुकुंद पोंधे, उपप्राचार्य, डॉ. अनुप दळवी, डॉ. सुनील देवकर, सहसचिव विक्रम सातपुते आदीसह महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते. स्पर्धेमध्ये एकूण १३ महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामना त्रिमूर्ती महाविद्यालय नेवासा फाटा व बोरावके कॉलेज यांच्यात झाला. यामध्ये त्रिमूर्ती महाविद्यालय विजयी झाले.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी अंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेची प्रशंसा करून विजेत्या व उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले. प्रास्ताविक डॉ. विजय म्हस्के यांनी केले. प्रा. संभाजी ढेरे यांनी आभार मानले.

# झरेकाठी शाळेत जुन्यांना निरोप व नव्यांचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : झरेकाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चार कर्तव्यनिष्ठ शिक्षकांना निरोप देताना विद्यार्थ्यांच्या डोळ्यातून अश्रू तरळले तर पालकांचे मन गहिवरून आले. या शिक्षकांनी फक्त पुस्तकी ज्ञानच नाही तर जीवनातील मोलाचे संस्कार आणि प्रत्येकाला जगाचे ज्ञान दिले, असे विचार संतोष गोसावी यांनी व्यक्त केले. सरपंच अशोक वाणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निरोप समारंभात ते बोलत होते.

रेखा गोसावी, दीपाली पवार आणि मंगल खेमनर या शिक्षकांच्या योगदानाला आदराने उजळा देण्यात आला. मान्यवरांनी बदलून गेलेल्या शिक्षकांविषयी जुन्या आठवणींना उजाळा दिला व त्यांच्या कामाचे कौतुक करून नव्याने आलेल्या शिक्षकांकडून चांगल्या कामाची अपेक्षा केली. नव्याने आलेले विनोद उर्किडे, प्रीती खालकर, बाळकृष्ण भालेराव व साठे यांचेही स्वागत व सत्कार करण्यात आला. बदलून गेलेल्या शिक्षकांतर्फे विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन व भेटवस्तू तसेच शाळेलाही भेटवस्तू देण्यात आली.

कार्यक्रमासाठी सुनंदा वाणी, ग्रामपंचायत सदस्य मनीषा वाणी, सुनिता वाणी, मंगल वाणी, विजय वाणी, अनुराधा वाणी, प्रियंका वाघचौरे, मंगल पाटील, शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष संभाजी व्यवहारे, उपाध्यक्ष गोरक्ष वाणी, जिजाभाऊ वाणी, सुदाम वाणी, सोमनाथ डोळे , सोन्याबापु वाणी, लक्ष्मण वाणी, विलास वाणी, गोरख वाणी, सुहास वाणी, भारत वाकचौरे, अमोल वाणी, राहुल वाणी, अभिनव, वाणी, मनोहर वाणी, राजेंद्र वाणी, सुनील वाणी, गणेश वाकचौरे, आदिनाथ वाणी, अंगणवाडी सेविका व मदतनीस, महिला पालक उपस्थित होते. प्रास्ताविक नवीन आलेले शिक्षक विनोद उर्किडे यांनी केले

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## अनुजा पवारची लेखापालपदी निवड



**राहुरी** : तालुक्यातील पिंपरी अवघड येथील अनुजा पवार हिची कोकण लेखा कोषागार विभागात लेखापाल पदी निवड झाली. अनुजा हिने कठीण परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या बळावर हे यश मिळवले. प्राथमिक, माध्यमिक शिक्षण राहुरी येथेच झाले. राहुरी कॉलेजमध्ये बीएससी कॉम्प्युटर सायन्सचे शिक्षण घेतले आणि २०२१ मध्ये पदवी पूर्ण झाल्यावर एमपीएससी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. कोरोनामुळे त्यांनी पहिले ३ वर्ष घरीच तयारी केली. पण यश तिला थोडक्यात हुलकावणी देत होते. अपयशाच्या काळात तिची आई चंद्रकला पवार खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या. वडील, भाऊ अजित आणि दाजी सचिन शेलार यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. २०२४ मध्ये जोमाने अभ्यास करून यशाला गवसणी घातली. सध्या अनुजा पोलीस उपनिरीक्षक पदाची मुख्य परीक्षा देऊन सहारा अकॅडमी राहुरी फॅक्टरी येथे पोलीस उपनिरीक्षक पदाच्या मैदानी चाचणीची तयारी करत आहे

## खा. वाकचौरे यांनी घेतले मतमाऊलीचे दर्शन

**शिरसगाव** : हरेगाव येथील संत तेरेजा चर्च मतमाउली भक्तीस्थानात खा.भाऊसाहेब वाकचौरे यांनी मतमाउली यात्रेनिमित्त भेट दिली व भाविकांना यात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या. चर्च कार्यालयात यात्रा कमिटी व पॅरिस कौन्सिल सदस्य यांनी स्वागत केले व चर्चा केली. यावेळी बहुउद्देशिय सभागृहाचा विकास त्याच बरोबर एक लाख लिटर पाण्याच्या टाकीचा प्रस्ताव मांडला. त्यावर खासदार निधीतून १० लाख रुपये देण्याचे आश्वासन त्यानी दिले. चर्च कमिटी उपाध्यक्ष सुभाष पंडित यांनी सुचविल्याप्रमाणे रे .फा. डॉमनिक रोझारिओ यांनी खा. वाकचौरे यांचा सत्कार केला.

## स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी पठाण

**श्रीरामपूर** : ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर्स फेडरेशनच्या आहिल्यानगरच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी श्रीरामपूर येथील धान्य दुकानदार रज्जाक पठाण यांची तर जिल्हा सचिवपदी नेवासा तालुक्यातील रास्तापूर येथील भरत भाकड यांची नियुक्ती करण्यात आल्याचे फेडरेशनचे प्रदेशाध्यक्ष गणपतराव डोळसे यांनी घोषित केले. हरिहर केशवगोविंद बन येथे फेडरेशनच्या झालेल्या जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात ही निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी श्रीरामपूरचे तालुकाध्यक्ष बजरंग दरंदले होते. मेळाव्यास सचिव बाबुराव म्हमाणे, नाशिकचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती महाराज कापसे, पुणे विभागीय अध्यक्ष शहाजी लोखंडे, जिल्हाध्यक्ष काशिनाथ आरगडे, मार्गदर्शक देविदास देसाई, नेवासा तालुकाध्यक्ष सुरेशराव उभेदळ, चंद्रकांत झुरंगे, विश्वासराव मोहिते, बाबा कराड, रासपचे आत्माराम कुंडकर, बाजार समीतीचे संचालक दशरथ पिसे, दिलीपराव गायके, ज्ञानदेव वहाडणे, विष्णुपंत डावरे आदी उपस्थित होते.

# चाळीस वर्षे रखडलेला आरक्षण रद्दचा प्रश्न मार्गी लागणार

## आ. खताळ यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : शहराच्या लगत असणारा अभंग मळा आणि वकील कॉलनी परिसरातील स. नं. ७८, ७९, ८० या जागांवरील नगरपालिकेचे आरक्षणप्रकरण तब्बल ४० वर्षापासून प्रलंबित होते. या प्रलंबित प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी आ. अमोल खताळ यांनी उपमुख्यमंत्री तथा नगर विकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या निर्णायक हस्तक्षेपामुळे हा प्रश्न मार्गी लागणार आहे. ४० वर्षापासून रखडलेला प्रश्न मार्गी लागणार असल्याने त्या परिसरातील रहिवाशांना मोठा



दिलासा मिळणार आहे तसेच शहराच्या लगत असणाऱ्या ढोलेवाडीच्या आदिवासी बांधवांच्या जमिनी फसवणूक प्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात आले असून या कुटुंबाला लवकरच न्याय मिळणार आहे.

अभंगमळा व वकील कॉलनी परिसरातील जागांवरील नगरपालिकेचे आरक्षण रद्द करण्याबाबत आ. खताळ

> काही नेते याचे श्रेय घेण्याचे प्रयत्न करत आहेत. पण जनतेला सर्वा ठावूक आहे की वस्तुस्थिती काय आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या थेट हस्तक्षेपामुळेच ४० वर्षांचा हा आरक्षणाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे व पालकमंत्री विखे यांनी या प्रकरणाबाबत दाखविलेल्या सकारात्मक भूमिकेबद्दल संगमनेरकरांच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो. **- आ. अमोल खताळ**

यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सतत पाठपुरावा केला. त्यांनी या प्रकरणाबाबत सकारात्मकता दाखविली होती. अखेर या जुन्या आरक्षणाबाबत लवकरच मार्ग काढला जाईल असे शिंदे यांनी खताळ यांना आश्वासित केले होते. त्यांनी या प्रकरणात आता लक्ष घातले असल्यामुळे प्रश्न लवकरच मार्गी लागले.

संगमनेर बु. येथील सिटी सर्वे नं. १६५० ई या मिळकतीवरील सत्ताप्रकार ब नोंदी काढण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्यामुळे नागरिकांना कायदेशीर व्यवहार करताना येणारे अडथळे भविष्यात दूर होणार आहेत. गुंजाळवाडी, कासारा दुमाला, समनापूर व राजापूर येथील शेतकऱ्यांच्या जमिनीवरील पोकळीस्त नोंदी रद्द करण्याची कार्यवाहीही सुरू झाली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज आणि शासकीय योजनांचा लाभ सहज मिळू शकेल.

## खा. लंकेंची गडकिल्ले संवर्धन मोहीम प्रेरणादायी : जयश्री थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेले गडकिल्ले हीच खरी महाराजांचे स्मारके असून त्यांची जपवणूक करणे हे प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य आहे. या किल्ल्यांची स्वच्छता व संवर्धन यासाठी खासदार निलेश लंके यांनी सुरू केलेले अभियान राज्यातील तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन डॉ.जयश्री थोरात यांनी केले.

अकोले तालुक्यातील पट्टा किल्ला विश्रामगड येथे खा. लंके यांच्या संकल्पनेतून आपला मावळा उपक्रमातून गड किल्ले संवर्धन अंतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी खा. निलेश लंके, डॉ.थोरात, प्रभावती घोगरे यांच्यासह तालुक्यातील १२०० युवकांनी सहभाग घेतला.



पट्टा किल्ला तथा विश्रामगडावर जिल्ह्यातील व संगमनेर तालुक्यातील सुमारे ३००० युवकांनी स्वच्छता व श्रमदान करून गड किल्ले संवर्धन अभियान राबवले. जय भवानी, जय शिवाजी घोषणासह हर हर महादेव, आम्ही मावळे शिवबाचे या घोषणांनी सह्याद्रीचा परिसर दुमदुमला. हातात झाडू, टोकरी, खोरे, आणि खांद्यावर भगवा झेंडा घेऊन या तरुणांनी पट्टा किल्ला परिसर स्वच्छ केला. यशोधन जनसंपर्क कार्यालय येथून १२०० युवक डॉ. थोरात यांच्या नेतृत्वाखाली पट्टा किल्ल्याकडे रवाना झाली होती.

डॉ. थोरात म्हणाल्या की, खासदार निलेश लंके यांनी कोरोना संकटामध्ये अत्यंत प्रभावी काम केले. संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या या युवा नेतृत्वाने भारताच्या संसदेमध्ये शेतकरी व सर्वसामान्यांसाठी आवाज उठवला. छत्रपती शिवाजी महाराजांचे गड किल्ले हे खरे स्मारक असून या किल्ल्यांच्या संवर्धनाकरता त्यांनी सुरू केलेले अभियान हे राज्यातील सर्व युवकांसाठी प्रेरणादायी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वधर्मसमभाव शिकवला. याच विचारांवर महाराष्ट्राचे राजकारण सुरू होते. मात्र सध्या देशात आणि राज्यात सत्ताधाऱ्यांकडून सुरू झालेले जातीभेदाचे राजकारण दुर्दैवी आहे.खासदार लंके म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याने कायम छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचा वारसा घेऊन काम केले आहे. महाराजांचा सर्वधर्मसमभावाचा विचार आपल्याला पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्रात न्यायचा आहे. प्रभावती घोगरे म्हणाल्या की, तरुणांच्या मनामध्ये जातीभेदाचे वीष पेरण्यापेक्षा सर्व धर्म भावाचे अमृत पेरले पाहिजे. याकरता हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

## मतमाऊली यात्रेत भजन संध्या भक्तिमय वातावरणात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील मतमाऊली यात्रेत विविध ठिकाणांवरून आलेल्या भजनी मंडळांनी मतमाऊलीची स्तुती आराधना केली. हा उपक्रम संत

तेरेजा चर्चच्या सहकार्याने संजय आढाव बहुउद्येशीय प्रतिष्ठानच्यावतीने राबविण्यात आला. सुरुवातीस प्रमुख धर्मगुरू फादर डॉमिनिक व फ्रान्सिस ओहोळ यांनी प्रार्थना केली. महाराष्ट्रातून ३२ भजनी मंडळांनी सहभाग नोंदवला. आ. हेमंत ओगले, जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे, नागेश सावंत, डॉ.अनिल बनसोडे, सुभाष पंडित, ॲड. नरेंद्र भिंगारदिवे, ॲड. सुषमा बनसोडे, शाम रणधीर, विजू त्रिभुवन, राहुल फटांगरे, संदीप गायकवाड, गौतम साळुंखे, सुहास राठोड, विजू पवार, आशिष शेळके, पत्रकार फिलिप पंडित आदी मान्यवरांच्या हस्ते मंडळांचा नसत्कार करण्यात आला. भाविकांना प्रतिष्ठानच्यावतीने मोफत चहाची व्यवस्था करण्यात आली होती. भजन संध्या यशस्वी करण्याकरिता प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय आढाव, राजू पठारे, सविता आढाव, आकाश आढाव, सतीश कदम, संदीप त्रिभुवन, निलेश चाबुकस्वार, गौतम बनसोडे, प्रतीक आढाव, आकाश पोटे, आकाश कदम, प्रमोद कदम, गणेश पारखे, ऋतुल पठारे, संजय बोधक, मयुर कदम, शुभम आढाव, मनिषा भिंगारदिवे आदींनी परिश्रम घेतले.

## रविवारी व्यसनमुक्ती शिबिर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील पढेगाव येथील मातृ-पितृ छाया प्रतिष्ठाणतर्फे रविवारी (दि.२१) सकाळी १०.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथे व्यसनमुक्ती प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष उत्तमराव शेलार व सचिव प्रमोद शेलार यांनी दिली. समाजात व्यसनमुक्तीविषयी जागृती निर्माण होऊन समाजात प्रबोधन व्हावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन केले आहे. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वसंतराव जमधडे असतील. आ. ओगले व प्रा.ड ॉ. बापू चंदनशिवे यांच्या हस्ते उदघाटन होईल. करण ससाणे, जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरेंगे, प्रविण कोंढावळे, विशाल गर्जे, मिलिंदकुमार साळवे, बापू भोर, किशोर बनकर, शिवाजी गोसावी, अरूण मंडलिक, डॉ.जालिंदर घिगे, सलीमखान पठाण, कैलास खंदारे आदी उपस्थित राहणार आहेत.

## दिव्यांगांना आता दोन हजार ५०० रुपये मानधन मिळणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : महाराष्ट्र शासनातर्फे संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्ध काळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेतील सर्व दिव्यांग व्यक्तींकरिता १५ सप्टेंबरला वाढीव मानधन रुपये २५०० लागू करण्याचा शासन निर्णय पारित केला आहे. गा निर्णय लागू करण्यासाठी लोकप्रतिनिधी, विविध दिव्यांग संघटना व सामाजिक संस्थांनी पाठपुरावा केला होता. त्या प्रयत्नाला यश आले आहे. डीबीटीमार्फत बँक खाते आधारकार्डशी लिंक

**शासन निर्णयाची अंमलबजावणी सुरू**

असणाऱ्या खात्यावर रकमा जमा होतील.

अपंग सामाजिक विकास संस्था व आसान दिव्यांग संघटनेने १९९७ पासून सातत्यपूर्ण या मागणीचा पाठपुरावा केला. अनेक आंदोलने केली. शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी व अनुदान तरतूद उपलब्ध करणे गरजेचे आहे.

डी.बी.टी. प्रणालीचा घोळ लवकर संपुष्टात आणावा.अशी मागणी अपंग सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष संजय साळवे, सचिव वर्षा गायकवाड, आसान दिव्यांग संघटनेच्या महिला प्रदेशाध्यक्ष स्नेहा कुलकर्णी, प्रदेशाध्यक्ष मुश्ताक तांबोळी, उप प्रदेशाध्यक्ष सुनील कानडे, जिल्हाध्यक्ष विश्वास काळे, खजिनदार साधना चुडीवाल, दत्तनगर शाखेच्या अध्यक्ष विमल जाधव, उपाध्यक्ष महेंद्र दिवे, खोकर शाखेचे अध्यक्ष विकास साळवे, भेर्डापूर शाखेच्या अध्यक्ष सुनीता जंजिरे, महादेव कनगरे, महिला तालुकाध्यक्ष प्रमिला कानडे, हरेगाव शाखाध्यक्ष राजेंद्र मगर, बेलापूर शाखाध्यक्ष दीपक साठे यांनी केली आहे.

## रेणुकादेवी आश्रमात सोमवारपासून शारदीय नवरात्र महोत्सव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्रीक्षेत्र रेणुका देवी आश्रमात संस्थापक मौनयोगी सद्गुरु रेवणनाथ महाराज यांच्या प्रेरणेने सालाबाद प्रमाणे शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून अश्विन शुद्ध प्रतिपदा अर्थात सोमवार दिनांक २२ सप्टेंबर(घटस्थापना) ते गुरुवार दिनांक २ ऑक्टोबर २०२५ (विजयादशमी )पर्यंत विविध अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा महोत्सवाचे ४८ वे वर्ष असल्याची माहिती आश्रमाच्या मुख्यविश्वस्त श्रीमती नलिनीदेवी जोशी यांनी दिली आहे.

सोमवारी २२ सप्टेंबर रोजी शुद्ध प्रतिपदेला पहाटे पाच वाजता रेणुका मातेची महापूजा व दुर्गा सप्तशती पाठारंभ होईल सकाळी दहा वाजता घटस्थापना व महाआरती होऊन नवरात्र महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. गुरुवार दिनांक २ ऑक्टोबर रोजी विजयादशमीला सकाळी नवरात्र उत्सापन व आरती होईल दुपारी दोन वाजेपासून सिमोल्लंघन, शमीपूजन व शस्त्रपूजन होणार आहे रात्री आठ वाजता धन, सोने (आपट्याचे पान )देवांना अर्पण करून देवदर्शन व औक्षणाने महोत्सवाची सांगता होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या दरम्यान दररोज आरती व विविध धार्मिक कार्यक्रम महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. परिसरातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील निमंत्रित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये तसेच सकाळी लवकर येणाऱ्या जोडीच्या शुभ हस्ते रेणुका देवीची सकाळी व सायंकाळी सहा वाजता महाआरती केली जाणार आहे. सातत्याने होत असलेला पाऊस तसेच मंदिराच्या जवळ असलेली लागू चारी व विहीर यामुळे मंदिराच्या तळघरात पाणी आले आहे.तळघरात गेल्या अनेक वर्षापासून नवरात्र महोत्सवात पाणी येते पाण्यातील देवी म्हणून परिसरात लौकिक झाला आहे. या नवरात्रातही तळघरात पाणी असून पाण्यातून जाऊन पाय धुऊन दर्शन घेताना भाविकांना एका वेगळ्या आनंदाची अनुभूती मिळते.

नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने मंदिर परिसर स्वच्छता सुरू आहे तसेच रस्त्यावरील दिवे दुरुस्तीचे काम ग्राम पंचायतीच्या सहकार्याने होत असून मंदिर कळसावर विद्युत रोषणाई केली जाणार आहे. आश्रमाच्या वतीने विविध सेवा दिल्या जाणार आहे त्यासाठी साधकांनी संपर्क साधावा आणि नवरात्र निमित्त आयोजित उपासना, उपक्रमांचा लाभ घेऊन भगवती दर्शनाचा आनंद घ्यावा असे आवाहन श्री रेणुका भक्त मंडळ परिवारातर्फे करण्यात आले आहे

## नागरिकांसाठी आयुष्यमान भारत कार्ड गरजेचे : स्नेहल खोरे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर भाजप व मोरया फाउंडेशन आयोजित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभरातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य हिताचा विचार करून सुरू केलेल्या आयुष्यमान भारत कार्ड कॅम्पचा प्रभाग १७ मधील कॅम्पचा शुभारंभ माजी नगरसेविका स्नेहल खोरे यांच्या हस्ते करण्यात आला. खोरे म्हणाल्या की, पालकमंत्रीराधाकृष्ण विखे पाटील, माजी खा. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे यांच्या नेतृत्वाखाली कॅम्प घेण्यात आला. त्याचा २८५ नागरिकांनी लाभ घेतला असून केंद्र व राज्य सरकारच्या योजना सामान्य माणसांपर्यंत पोहचविण्यासाठी मोरया फाउंडेशन कटिबद्ध आहे.

आयुष्यमान कार्डच्या माध्यमातून एका कुटुंबाला ५ लाखांपर्यंत वैद्यकीय मदत मिळणार आहे. आयुष्यमान भारत कार्ड कॅम्प पुढील काही आठवडे राबविण्यात येणार असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन खोरे यांनी यावेळी केले. यावेळी अशोक कोरडे, सीमा पटारे, अण्णासाहेब पंडित, राजकुमार काले, बाबुराव घोडेकर, रोहिणी लाड, द्रौपदी कल्याणकर, दीपाली जऱ्हाड, अंजली राजूळे, संदीप लचके, अमोल माळवे, अनिल कल्याणकर, इंदुमती शेलार, प्रवीण खरे, विजय जगताप, गणेश मगरे, सुनील नागरे, कुणाल दहिटे, संस्कृती जगताप आदींसह नागरिक उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

मे. उपविभागीय अधिकारी साहेब, संगमनेर यांचे कोर्टात
विलंबमाफी अर्ज नं.३०/२०२४
**संजय भागीनाथ जाधव व इतर - अपेलंट / अर्जदार**
**विरुध्द**
**संजय संपत आढाव व इतर- रेस्पॉडंट / सा.वाला**

ज्या अर्थी वरील अपेलंट / अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये विलंब माफीचे अर्जासह अपील दाखल केले आहे. त्या विलंब माफी अर्जात तुम्ही रेस्पॉडंट / सा.वाला नं. ४ गोरख बाबुराव जाधव, ७. मारुती बाजीराव जाधव, दोघे रा. खांडगावं, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर म्हणून सामील आहात. त्या अर्थी या नोटीसीने आपणास कळविण्यात येते की, सदर अपीलाचे / अर्जाचे कामकाजासंदर्भात तुम्ही स्वतः अथवा वकिलांमार्फत ता. २३/०९/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. उपविभागीय अधिकारी साहेब, संगमनेर, ता. संगमनेरे, जि. अहिल्यानगर या ठिकाणी हजर रहावे. वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस आपण हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. असे या नोटीसमार्फत सुचित करण्यात येत आहे.आज दि. १६/०९/२०२५ रोजी माझे सही/शिक्क्यानिशी तथा न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली आहे.

ठिकाण - संगमनेर
शिक्का
मे. उपविभागीय अधिकारी साहेब,
संगमनेर

**जाहीर नोटीस**

निशाणी नंबर : ६
दिनांक : ०२/०९/२०२५
नेमलेली तारीख ०७/१०/२०२५

ॲड.ए.जी. करडक
नेवासा कोर्ट,
मो नं. ९८५०८५५७०१

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, सि. डी. यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ९२/२०२५

**अर्जदार-**
१. संगिता सुरेश वाघ वय ४४, धंदा घरकाम
२. अनिकेत सुरेश वाघ वय २५, धंदा शिक्षण
३. स्वरीत सुरेश वाघ वय १४, धंदा शिक्षण
नं.३ चे अपाक अर्जदार नं. १ जनक आई
सर्व रा. वरखेड,ता. नेवासा जि. अ.नगर मो नं.७९७२१८८९२०

**सामनेवाले -कुणीही नाही**
**मयत - सुरेश रामनाथ वाघ, मयत दिनांक २३/०६/२०२५**

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयामध्ये मयतास वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला असून मयत सुरेश रामनाथ वाघ हे दि. २३/०६/२०२५ रोजी मौजे मुकिंदपुर ता. नेवासा येथे मयत झालेले आहे. त्यांना अर्जदार हेच वारस आहेत. मयत सुरेश रामनाथ वाघ हे आरोग्य विभागामध्ये आरोग्य सहाय्यक (निरीक्षक) यापदावर शिरसगांव प्राथमिक आरोग्य केंद्र ता. नेवासा येथे नोकरी करत होते. ते नोकरीस असतांना व त्यांची सेवा बजावत असतांना ते आजारी पडून त्यांचा ह्रदयविकाराने मृत्यु झालेला आहे. मयत सुरेश रामनाथ वाघ यांचे जागेवर अनुकंप तत्वानुसार त्यांचा मुलगा अर्जदार नं.२ अनिकेत सुरेश वाघ यास नोकरीची अत्यंत गरज आहे व त्याचे शिक्षण एम.एस.सी (केमिस्ट्री) व सॅनेटरी इन्स्पेक्टरचा कोर्स चालु आहे. त्यामुळे त्याने संबंधीत विभागाकडे त्याबाबतीत चौकशी केली असता संबंधीत विभागाकडून योग्य कोर्टमार्फत मयत सुरेश रामनाथ वाघ यांचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्राची मागणी केली म्हणून अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र सादर करावयास सांगितले, म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला होता व आहे. त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही एक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून दि.०७/१०/२०२५ रोजी पर्यंत किंवा ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०९/२०२५ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा नेमलेली तारीखः ०७/१०/२०२५

वरिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर नेवासा

शिक्का

हुकूमावरुन
सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय, व. स्तर
नेवासा

**राहुरी नगरपरिषद, राहुरी, जि.अहमदनगर**

**बांधकाम विभाग**

जा.क्र.कावी ३/बांध/१३१८/२०२५
दिनांक १६/०९/२०२५

**बी-१ निविदा / दरपत्रक सूचना (वार्षिक)**

मा.मुख्याधिकारी, राहुरी नगरपरिषद यांचेकडून राहुरी नगरपरिषदेस करावयाच्या खालील वार्षिक कामाची (सन २०२५-२६) निविदा द्विलिफाफा पद्धतीने (बी-१ निविदा) सक्षम प्राधिकरणाकडे योग्या त्या वर्गात नोंद असलेल्या नोंदणीकृत व अनुभवी संस्था / मक्तेदार यांचेकडून मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज-पत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | फॉर्म फी१८% GST सह | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | राहुरी नगरपरिषद बांधकाम विभागाकरिता ढापे पुरवठा करणे (सर्व शासकीय करासह) | दरपत्रक | २,०००/- | ५००/- | ३१ मार्च २०२६ |

**नियम व अटी -** १. कोरे निविदा नमुने विक्री दिनांक १७/०९/२०२५ ते दिनांक २४/०९/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत रोख किंमतीस विकत मिळतील. मोहरबंद निविदा दिनांक २५/०९/२०२५ रोजी सायं. ०५.०० वा.पर्यंत स्विकारल्या जातील. प्राप्त निविदा दिनांक २५/०९/२०२५ रोजी सायं. ०५.०० वा.संबंधित मक्तेदार / प्रतिनिधी यांचे समक्ष मा.मुख्याधिकारी यांचे दालनात अथवा मे.सभेत उघडल्या जातील.
२. निविदा इसारा रक्कम रोख स्वरुपात भरावी लागेल.
३. इतर सविस्तर अटी व शर्ती बांधकाम विभाग, राहुरी नगरपरिषद येथे पहावयास मिळतील

XXX
(पराग दराडे)
नगर अभियंता,
राहुरी नगरपरिषद, राहुरी

XXX
(ऋषिकेश पाटील)
मुख्याधिकारी,
राहुरी नगरपरिषद, राहुरी

## कृषि अभियांत्रिकीत करिअर करण्याच्या अनेक संधी : डॉ. नलावडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : कृषि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतल्यानंतर विविध क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. यासाठी अधिक जागृत राहून अभियांत्रिकीच्या विषयांबरोबरच विविध संधीचा फायदा घेऊन विविध क्षेत्रांमध्ये करिअर घडवावे, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांकित्री महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्यावतीने आयोजित दीक्षारंभ व अभियंता दिवस कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून डॉ. नलावडे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर येथील





किसान कार्पोरेशन कंपनीचे प्रमुख शैलेंद्र अडसुरे उपस्थित होते. यावेळी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, कृषि प्रक्रीया अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. कैलास कांबळे, अक्षय उर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. वीरेंद्र बारई, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे, कृषि अवजारे व यंत्रे प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड, लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे व सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के उपस्थित होते.

डॉ. नलावडे म्हणाले की, जगाचा पोशिंदा जो शेतकरी आहे त्याच्या जीवनात आनंद निर्माण होईल असे संशोधन करुन दाखवा. आज अभियंता दिवस आहे आणि आपण सर्वांनी या क्षेत्रात पदार्पण केले आहे. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिवस अभियंता दिवस म्हणून साजरा करतो.

अडसुरे म्हणाले की, तुम्हाला पुढे काय करायचे आहे हे स्वतः ठरवा. स्वतःचे निर्णय स्वतः घ्या. आवड आहे तेच क्षेत्र करियरसाठी निवडा. त्यासाठी कठोर मेहनत करा. तुमच्या आयुष्यातील ठराविक काळच तुम्हाला खूप मेहनत करावी लागेल. परंतु त्याला कोणताही पर्याय नाही. याप्रसंगी डॉ. विक्रम कड, डॉ. कैलास कांबळे, डॉ. वीरेंद्र बारई, डॉ. शैलेंद्र गडगे व डॉ. प्रविण कदम यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. कैलास कांबळे यांनी दीक्षारंभ कार्यक्रम व अभियंता दिवसाबद्दल सविस्तर माहिती दिली. पहिल्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच त्यांचे पालक यांचे गुलाब पुष्प देऊन मान्यवरांनी स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी तर आभार डॉ. महेश पाचारणे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

### अन्यायकारक प्रभागरचना केल्याच्या निषेधार्थ

# वंचितचा राहुरी नगरपालिकेवर मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : राहुरी नगरपालिकेने आदिवासी समाजावर अन्यायकारक प्रभाग रचना करून एसटी चे आरक्षण इतर प्रभागांमध्ये केल्याच्या निषेधार्थ व इतर सामाजिक मागण्यांकरिता दि. १६ सप्टेंबर रोजी राहुरी नगरपालिकेवर वंचितच्या वतीने जवाब दो मोर्चा आयोजित करण्यात आला. याबाबत नगरपालिका प्रशासनाला काल निवेदन देण्यात आले.

वंचित बहुजन आघाडीचे महासचिव अनिल जाधव व तालूकाध्यक्ष संतोष चोळके यांच्या नेतृत्वाखाली काल दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी नगरपरिषदेचे अधिकारी विकास घटकांबळे यांना निवेदन देण्यात आले. त्या निवेदनात म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने २०२५ मध्ये होणाऱ्या नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिकेची वार्ड रचना करण्याचे आदेश नगरपालिकेला दिले आहेत. ही वार्ड रचना करताना राहुरी नगरपालिकेमध्ये स्थानिक राष्ट्रवादी व भाजपच्या पुढाऱ्यांनी हस्तक्षेप करून आदिवासी वस्त्या आपल्या फायद्यासाठी इतर वार्डात ढकलण्याचे काम करून आदिवासी समाजाच्या मतांची ताकद कमी करण्याचे महापाप केल्याचे निदर्शनास आले आहे.

ही प्रभाग रचना करीत असताना नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक पुढाऱ्यांच्या सांगण्यावरून त्यांच्या सोयीच्या जागेवर आपल्या मतांचा विचार करून आरक्षण टाकण्यात आले. हे करून नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दलित, आदिवासी वस्त्यांचे विभाजन न करण्याच्या शासन निर्णयाचे उल्लंघन करून आपल्या कर्तव्यात कसूर केला आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या अधिकाऱ्याने सांगितल्या नुसार दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी अंतिम यादी नगरपालिकेत लागणार आहे. या अंतिम यादीला वंचित बहुजन आघाडी या पक्षाच्या माध्यमातून कोर्टात आव्हान देण्यात येणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर करून दलित आदिवासी शासन निर्णय यायचे उल्लंघन केले, म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. राहुरी नगरपालिकेच्या हद्दीमध्ये आदिवासींच्या वस्तीचे विभाजन न करता त्या वस्त्या एका वार्डात घेऊन त्याच आदिवासी बहुल भागात त्यांना आदिवासींच्या आरक्षणाची जागा द्यावी. या आशयाची याचिका न्यायालयात दाखल करण्यात येणार आहे.

राहुरी येथील दलित आदिवासी व नगरपालिकेच्या हद्दीतील मतदारांना सदर माहिती कळावी व राजकीय नेते एकत्र येऊन गोरगरिबांचे राजकीय हक्क कसे हिरावून घेतात. याची जनजागृती करण्यासाठी दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी राहुरी नगरपालिकेवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जवाब दो मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

निवेदनावर अरुण साळवे, बाबासाहेब साठे, आबासाहेब कदम, राजमोहम्मद शेख, दिपक साळवे, अनिल माळी, मंगेश माळी, विकास माळी, मिनीनाथ धाडगे, जितू बर्डे, लखन बर्डे, अक्षय पवार, कांता गायकवाड, भीमा माळी, सुंदर बर्डे, बाळू पवार, आकाश गवळी, अर्जुन माळी, राहुल धाडगे, विशाल बर्डे, करण माळी, लखन बर्डे आदींच्या सह्या आहेत.

# संजय साळवे यांची जिल्हा व्यवस्थापन समितीवर निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिरसगाव** : जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या व्यवस्थापन व कामकाजाच्या दृष्टीने नव्याने जिल्हा व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली आहे. यात जिल्हा व्यवस्थापन समितीवर संजय साळवे यांची निवड करण्यात आली आहे. रत्नाकर ठाणगे अशासकीय सदस्य,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अहिल्यानगर सदस्य सचिव ही कमिटी दिव्यांगांच्या पुनर्वसनात्मक कामकाजाच्या दृष्टीने भविष्यात कामकाज पाहणार आहे.

संजय साळवे यांनी दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालयामार्फत ५८ दिव्यांग व्यक्तींना बीज भांडवल योजनेचा लाभ मिळवून देत स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला आहे.

मागील पंचवीस वर्षापासून दरवर्षी राज्यस्तरीय दिव्यांग वधु वर परिचय मेळावा व सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करून आजगायत २८८ दिव्यांग व्यक्तींचे विवाह मोफत संपन्न करण्यात आले आहे. त्याचबरोबर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रामार्फत आत्तापर्यंत १४ दिव्यांग व्यक्तींना बॅटरीवरील सायकल उपलब्ध करून दिले आहे.तसेच अनेक दिव्यांग बांधवांना व्हीलचेअर,कुबडी व इतर कृत्रिम साहित्य उपलब्ध करून देऊन दिव्यांगांच्या जीवनात नवी पहाट निर्माण करण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या या कार्याची पावती म्हणूनच त्यांची निवड जिल्हा व्यवस्थापन समितीवर करण्यात आली आहे. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड,जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र जिल्हा समन्वयक डॉ.दीपक अनाप, दिव्यांग शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

पान १ वरुन

# महाराष्ट्रात पावसाचे थैमान!

दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने या परिस्थितीचा सामना करावा, राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे.' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यात पावसाचे थैमान चालू असून गेल्या दोन महिन्यात अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सरकारी आकडेवारीनुसार, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे. कृषीमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले की, राज्य सरकार त्यांच्या पाठीशी उभी आहे आणि त्यांना आर्थिक तसेच तांत्रिक मदत मिळेल. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी धैर्य गमावू नये, योग्य मार्गदर्शन घेऊन आपली शेती सुधारण्यावर भर द्यावा, अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे. ऑगस्ट-सप्टेंबरच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या या मोठ्या नुकसानामुळे शेतकरी आणि राज्यासाठी मोठा आव्हान उभा राहिला आहे. मात्र, योग्य वेळेत नुकसानभरपाई, मदत आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कमी होण्याची शक्यता आहे.

# सव्वा लाख लाडक्या बहिणी अपात्र

वयोमर्यादेचं उल्लंघन.(२१ वर्षाखालील किंवा ६० पेक्षा जास्त), बनावट दस्ताऐवज किंवा चुकीची माहिती, एका घरातून ३ किंवा त्याहून अधिक महिलांनी लाभ घेणे, अन्य योजनांचा लाभ घेऊनही लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज, अधिकारणामुळे या महिलांना योजनेतून वगळण्यात आले आहे.दरम्यान, राज्य सरकारकडून योजनेच्या पारदर्शकतेसाठी आणखी टप्पेवार पडताळणी केली जाणार असल्याचं सांगितलं जात आहे. अपात्र ठरवण्यात आलेल्या महिलांना शासनाकडे दाद मागण्याचा अधिकार आहे, परंतु त्यासाठी आवश्यक कागदपत्रं आणि पुरावे सादर करावे लागणार आहेत.

# सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा : मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : तालुक्यातील डोणगाव मंडळात सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी गंगापूर तहसीलदार यांना सुचना करावी अशी मागणी ईमेल द्वारे आमदार प्रशांत बंब यांच्या कडे करण्यात आली आहे.

डोणगाव मंडळातील पिंपळगाव, दिवशी, पाचपिरवाडी ,डोणगाव रायपूर, किन्हळ, देर्हळ,पाडळसा, बाभुळगाव, सनव दिनवाडा वैरागड धामोरी माळीवाढगाव शिवारातील मागील आठवडाभरा पासुन सततच्या पडणार्या पावसामुळे खरीप हंगामातील सोयाबीन कापूस मक्का,मुग ,कांदा, टोमॅटो व इतर पिके सडली करपली जळाली आहे.गेल्या आठवडाभरात ऊन न पडल्याने शेतातील पाण्याचा निचरा होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांची पिके १००टक्के खराब झाली आहेत.

शासन निर्णयानुसार ३३ टक्के नुकसान किंवा १०० मिमी पाऊस पडल्यानंतर नुकसानीचे पंचनामे अपेक्षित आहे परंतु जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना १९ सिं २०२५ रोजी निवेदन देऊन सुद्धा पंचनामे आदेश नसल्याने संबंधित तलाठी पंचनामे करण्यास टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारी शेतकरी कृती समिती कडे फोटो सह प्राप्त झाल्या आहेत. सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील पीक गेल्याने दुबार लागवडीचे संकट आल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. तसेच सततच्या पावसामुळे शेत रस्त्याची दुरवस्था बिकट झाली आहे. संबंधित विभागाना सुचना कराव्यात अशी मागणी डोणगाव मंडळातील शेतकऱ्यांच्या वतीने शेतकरी कृती समितीचे महेश गुजर यांनी गंगापूर विधानसभा मतदारसंघचे आमदार प्रशांत बंब यांच्याकडे केली आहे.

# श्रीराम विद्यालयात मारुतराव घुले पाटील यांना जयंतीनिमित्त अभिवादन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील देवगाव येथील श्रीराम विद्यालयात स्व.लोकनेते मारुतराव घुले पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वाटप करण्यात आले. स्व.घुले पाटील साहेब हे दूरदृष्टीचे नेते होते त्यांच्यामुळे आज हजारो विद्यार्थी शिक्षण प्रवाहात येऊन उच्च शिक्षण घेऊन विविध पदांवर सेवेत आहे ही त्यांच्याच कार्याची पुण्याई असल्याचे प्रतिपादन जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन यांनी केले.

लोकनेते मारुतराव घुले पाटील हे ग्रामीण भागातील मुलामुलींना शिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून देणारे दूरदृष्टीचे नेते होते. त्यांच्या प्रयत्नातून हजारो विद्यार्थी घडत आहेत ,शेतकऱ्यांना सहकाराच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनाचे बळ त्यांनी दिले. शिक्षण, सहकार व समाजकारण या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी दीपस्तंभ असल्याचे कारभारी नजन यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवा संस्था माजी अध्यक्ष कदिरखान पठाण होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कचरदास गुंदेचा यांनी यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे भाषणात कौतुक केले. प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन यांनी आपल्या भाषणातून जयंती कोणाची साजरी करतात व त्यामागील विचार काय असतो याचे सविस्तर विवेचन केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत रोख बक्षिसे देऊन गौरविले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी पंचायत समितीचे माजी सदस्य अजितदादा मुरकुटे व प्राचार्य सोपानराव सतरकर शिक्षक बाळासाहेब भगत यांचीही भाषणे झाली.

प्राचार्य सतरकर प्रास्ताविक करून स्पर्धांची माहिती दिली. सूत्रसंचालन भरतसिंग परदेशी यांनी केले तर आभार सिकंदर शेख यांनी मानले.

या प्रसंगी रामभाऊ तागड,विठ्ठल बनसोडे,महेश निकम,प्रमोद मडके,तान्हाजी गुंजाळ,श्रीमती सुनिता कर्डिले यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगामाई इंडस्ट्रीजचे संचालक मुळे यांनी घेतले पैस खांबाचे दर्शन



**नेवासा** : येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी जयंती निमित्ताने अहिल्यानगर येथील गंगामाई इंडस्ट्रीज अँण्ड कंन्स्ट्रक्शन्सचे कार्यकारी संचालक रणजीत मुळे यांनी भेट देऊन माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या पैस खांबाचे दर्शन घेतले.

जगाला शांततेचा संदेश देणारा महान ग्रंथ या पवित्र भूमीत रचला गेला,अशा पावन भूमीत आज ज्ञानेश्वरी जयंती निमित्ताने दर्शन घेण्याचा योग आला हे माझे भाग्य समजतो अशी भावना मुळे यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केली. यावेळी मुळे यांनी मंदिर परिसरातील सुरु असलेल्या विकास कामाची माहिती घेतली.यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांच्या हस्ते रणजीत मुळे व ग्रीन गोल्ड सीडचे अजित मुळे, महको सीडचे रितेश मिश्रा यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थानचे जनसपर्क आधिकारी आशिष कावरे,डॉ.शंकरराव शिंदे,योगेश रासने,गंगामाई साखर कारखान्याचे नवनाथ मारकळी,रवि जमधडे यांच्या सह गंगामाई साखर कारखान्याचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पालकांच्या आंदोलनाला यश

## शाळेत सातवीचा वर्ग पुन्हा भरणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : तालुक्यातील शेवटच्या टोकाला असलेल्या मनेगाव जिल्हा परिषद शाळेत सातवी पर्यंतच्या वर्गांना तीनच शिक्षक असल्याने सोमवारी पालकांनी आपली मुलं शाळेत पाठवली नाही. मंजूर शिक्षक मिळत नाही, तो पर्यंत मुलांना शाळेत न पाठवण्याचा निर्णय पालकांनी घेतल्यांनी विद्यार्थ्यांविनाच शिक्षकांना शाळा भरवावी लागली होती. मनेगाव जिल्हा परिषद शाळेत दोन पदवीधर शिक्षक मंजूर असतानाही एकही शिक्षक अद्यापही हजर झालेले नव्हते. पालकांच्या या आंदोलनानंतर शाळेला एका पदवीधर शिक्षकाची व्यवस्था करण्यात आली असून सप्टेंबर नंतर दुसऱ्या मंजूर शिक्षकाची नेमणूक केली जाणार असल्याचे आश्वासन पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने दिल्या नंतर पालकांनी आपले आज मंगळवारी आंदोलन मागे घेत मुलांना शाळेत पाठविले.

मनेगाव जिल्हा परिषद शाळेत एक ते सातवी पर्यंतचे वर्ग असून यामध्ये एक ते पाचवी पर्यंत ८१ विद्यार्थी आहे, तर सहावी व सातवीच्या वर्गात एकून २५ विद्यार्थी आहे. एक वर्षापूर्वी सहावी व सातवीला दोन शिक्षक मंजूर होते, त्यातील एक शिक्षक पदोन्नती मिळाल्याने बदलून गेले. त्यामुळे वर्गांसाठी एकच शिक्षक शिल्लक राहिले होते. मात्र नवीन बदल्यांमध्ये ते एकही शिक्षक बदलून गेल्याने या वर्गांसाठी पदवीधर शिक्षकच शिल्लक राहिले नाही. पालकांनी एकत्र येत आपली मुले शाळेत न पाठवण्याचा निर्णय घेतला. मात्र तत्पुरवी शाळेत शिक्षक नसल्याबाबतची कल्पना पालकांनी प्रभारी गटशिक्षण अधिकारी शबाना शेख यांना दिली होती. काल पालकांसमवेत विस्तार अधिकारी वाकचौरे व केंद्र प्रमुख लांडे यांनी बैठक घेतली. यावेळी एक पदवीधर शिक्षक देणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले होते, तर शेख यांनी भ्रमणध्वनीद्वारे चर्चा केली.

हक्काचे दोन शिक्षक मिळालेच पाहिजे या मागणीवर पालक ठाम राहिल्याने याबाबतची कोंडी कायम राहिली होती. मात्र आज सकाळी एक शिक्षक हजर झाल्याने पालकांनी आपली मुले शाळेत पाठवली. यावेळी शिक्षण व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग कोल्हे, सरपंच अण्णासाहेब गांगवे, सुखलाल गांगवे, मच्छिंद्र गोऱ्हे, भगिरथ झिंजुर्डे, जनार्दन गोऱ्हे, अमोल गोऱ्हे, संतोष गांगवे, शहाजी झिंजुर्डे, सोमनाथ झिंजुर्डे, योगेश कालेवार, एकनाथ जाधव, मच्छिंद्र आढाव, दिलीप आढाव, हिरामण आढाव, पोपट आढाव, बाळासाहेब आढाव, प्रकाश कालेवार, संपत मोरे, विशाल माळी, दीपक कोल्हे, सागर गोधडे साईनाथ जाधव, नवनाथ जाधव, मनोज लहामगे आदी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे : आ. विठ्ठलराव लंघे



**नेवासा :** महाराष्ट्राचा शेतकरी पुन्हा एकदा कांद्याच्या दरपडीत भरडला जात असताना, शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे अशी ठाम मागणी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे मंत्रालयात आयोजित बैठकीदरम्यान केली.

महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे कांदा उत्पादक राज्य. कांद्याच्या चांगल्या दर्जामुळे देशाबरोबरच परदेशातसुद्धा त्याला मोठी मागणी आहे. मात्र यावर्षी उत्पादनात झालेली विक्रमी वाढ, शेजारील देशातील अस्थिर परिस्थिती यामुळे कांद्याचे दर कोसळले आहेत. नीचांकी भावामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल करता येत नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार लंघे यांनी सरकारसमोर राज्य किंवा केंद्र शासनामार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू करावी आणि.प्रती हेक्टरी कांदा पिकाला थेट अनुदान द्यावे. या दोन मागण्या स्पष्ट मांडल्या. तसेच भविष्यकाळात अशा कांद्याचे भाव घसरण्याचे प्रकार टाळण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून पिकाचे क्षेत्र व बाजारपेठेची सांगड घालणारा प्रकल्प महाराष्ट्रात राबवावा, अशी दूरदृष्टीही त्यांनी बैठकीत मांडली. हा प्रकल्प शेतकरी उत्पादक कंपनी फेडरेशन किंवा खाजगी संस्थेकडे सोपवावा, अशीही सूचना त्यांनी केली.

सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी राहते. याही संकटावर योग्य तोडगा निघेल, अशी अपेक्षा आहे, असे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी बैठकीनंतर सांगितले.

## अतुल रासकर यांची भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



**गंगापूर** : येथील युवा नेतृत्व अतुल रासकर यांची भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या नियुक्तीत भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते व भाजपा युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष अमोल जाधव यांनी रासकर यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

रासकर यांच्या या निवडीबद्दल आमदार प्रशांत बंब, तसेच गोपाल वर्मा, रज्जाक पठाण, रवींद्र चव्हाण, कृष्णकांत व्यवाहारे, किशोर धनायत, प्रदीप पाटील, मारुती खैरे, दिपक साळवे, राजेंद्र राठोड, नंदु सजगुरे, ज्ञानेश्वर सवई, प्रशांत मुळे, दिनेश राऊत, अमोल शिंदे आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

**CHANGE OF NAME**

OLD NAME
**PRAVEEN MODE SHIVRAM MODE**
NEW NAME **PRAVIN SHIVRAM MODE**
**ADD: SANJIVANI VASAHAT RAHURI KURED TAL. RAHURI DIST. AAHILYANAGAR 413705,**

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५**

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत
१२९ ४८० ६६० **२-३** १२० ६७० ५८०
जोड २६-०३-४३-७९-३५

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत
१६७ १४६ १०० **४-१** १३७ १४६ १००
जोड ४६-२१-३५-९७-६८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत
१२८ २९० २२७ **१-०** १४५ २३५ ५५०
जोड १२-६९-१८-७७-८८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |
| 23/06/2025 to 28/06/2025 | 159 53 247 | 125 81 236 | 279 81 137 | 248 48 800 | 256 31 344 | 349 64 590 |
| 30/06/2025 to 05/07/2025 | 145 06 349 | 470 14 699 | 334 02 660 | 470 15 780 | 369 89 126 | 223 75 267 |
| 07/07/2025 to 12/07/2025 | 189 81 380 | 233 88 224 | 378 88 189 | 699 41 335 | 248 48 125 | 458 77 467 |
| 14/07/2025 to 19/07/2025 | 789 44 248 | 116 85 140 | 138 28 189 | 359 72 138 | 689 36 268 | 678 13 346 |
| 21/07/2025 to 26/07/2025 | 790 68 350 | 678 10 299 | 389 05 456 | 377 71 669 | 378 82 345 | 150 61 678 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

दखल

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे कबड्डी स्पर्धेत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव:** मिरजगाव येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या कबड्डी मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यामधून एकूण ४० संघ आलेले होते. महाविद्यालयाच्या संघातील संग्राम शिंदे याची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, चांदवड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तर संघातील सर्व खेळाडूंनी स्पर्धेमध्ये अतिशय चांगली कामगिरी करून तृतीय क्रमांक मिळविला. त्यामध्ये कापसे युवराज, भिसे ऋषिकेश, जगताप संस्कार, म्हेत्रे सौरभ, हिरडे सौरभ, कोथिंबीरे हर्षल, कापसे शिवराज, वायकर विशाल, पवार निखिल, वायकर कृष्णा, कोळपे कृष्णा, पवार प्रशांत इ. खेळाडूंनी स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य बाबासाहेब भोस, महावीर पटवा, प्र. प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ.नितीन थोरात, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. रमेश थोरात ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य रत्नाकर झिटे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कबड्डी संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालिका कल्पना बागुल व क्रीडा शिक्षक संजय डफळ, जुबेर बागवान यांचे मार्गदर्शन लाभले.

## उद्योगक्षेत्रात रसायनशास्त्र पदवीधरांना मोठ्या संधी : डॉ. जयश्री खेडकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :**-निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने बी.एस्सी./एम.एस्सी. रसायनशास्त्रा विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते . या व्याख्यानासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग, आनंद कॉलेज, पाथर्डीच्या, डॉ जयश्री खेडकर या उपस्थित होत्या. यावेळी बोलताना खेड्कर म्हणाले रसायनशास्त्र या विषयातील उच्च शिक्षणानंतर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विविध करिअर संधींचा सविस्तर आढावा घेतला. उद्योग क्षेत्र, संशोधन क्षेत्र, अध्यापन, शासकीय नोकऱ्या तसेच उद्योजकता यामध्ये रसायनशास्त्र पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत, यावर त्यांनी विशेष भर देऊन विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. खाटीक भाऊसाहेब यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा म्हस्के वैशाली यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. गुंजाळ शीतल यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुकळे पी. ए. कार्यक्रमाचे संयोजक प्रा गरड दिपाली प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सीईओ मोरे यांनी कॅन्टोन्मेंटमध्ये आमूलाग्र बदल घडवले : डॉ. उद्धव शिंदे.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** - नागरिकांच्या समस्या मांडण्यासाठी अर्जाची आवश्यकता राहिली नाही. पाणीपट्टी भरण्यासाठी रांगेत उभे राहावे लागत नाही. मोबाईल ॲपद्वारे दिलेल्या तक्रारींचे केवळ तीन दिवसांत निवारण होते. असे आमुलाग्र बदल छावणी परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांनी साडेतीन वर्षांच्या कार्यकाळात कॅन्टोन्मेंटमध्ये घडवून आणले, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले. छावणी परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांची बदली डिफेन्स इस्टेट ऑफिसर भुवनेश्वर (ओडिसा सर्कल) येथे झाल्याने त्यांना स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी तिरंगा फ्रेम देऊन सन्मानित केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडियर पी. सुनील कुमार उपस्थित होते. 'स्नेहबंध' चे अध्यक्ष डॉ. शिंदे म्हणाले, जॉगिंग ट्रॅक, शाळा, आरोग्य यासह विविध दर्जेदार सुविधा नागरिकांना उपलब्ध झाल्या. ऑनलाइन प्रणालीमुळे सेवा अधिक सुकर व पारदर्शक झाल्या. त्यासाठी सीईओ मोरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला.




छावणी परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांना शुभेच्छा देताना 'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे समवेत छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडियर पी. सुनील कुमार.

# शालेय विद्यार्थ्यांना गावी परतण्यासाठी अधिकाऱ्यांची मदत

### गटविकास अधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांनी बसस्थानकात जाऊन बस सोडल्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शहरातील विविध विद्यालये व प्राथमिक शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना शाळेतून सुट्टी देण्यात आल्यानंतर बसस्थानकावर विद्यार्थ्यांची एकच गर्दी झाली. गटविकास अधिकारी सोनल शहा व गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ तातडीने बसस्थानकाकडे धाव घेत आगारप्रमुखांना विनंती करून जादा बसेस सोडण्यास सांगीतल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या त्यांच्या गावी परत जाण्यासाठी दिलासा मिळाला. शेवगाव शहर व तालुक्यात शनिवार व रविवारच्या रात्रीच्या तुफान पावसाने झालेल्या आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली. अतिवृष्टी व पुरपरिस्थितीचा फटका अहिल्यानगर जिल्हयाला बसल्याने जिल्हाधिकारी पंकज आशिया




यांनी शाळा व्यवस्थापन समितीला विद्यार्थ्यांना सोमवारी व मंगळवारी ( दि. १५ व १६) सुट्टी देण्याबाबत अधिकार देण्याचे आदेश काढले. हे आदेश मुख्याध्यापक व शिक्षकांपर्यंत पोहचल्यावर त्यांनी सोमवारी विद्यार्थ्यांना सुट्टीबाबत सांगून सुरक्षित घरी जाण्यास सांगीतले. शेवगाव शहरात शहरातुन तसेच तालुक्यातील अनेक गावांवरून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. सर्वच शाळांनी अचानक सुट्टी दिल्याने शेवगाव बसस्थानकावर विद्यार्थ्यांची एकच गर्दी उसळली. ही बाब लक्षात येताच गटविकास अधिकारी सोनल शहा व गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांच्यासह शिक्षण विभागातील विशेष शिक्षक यांनी बसस्थानकाकडे धाव घेतली. आगारप्रमुख ऋषिकेश सोनवणे यांची भेट घेऊन परिस्थीतीचे गांभिर्य सांगीतले. त्यानंतर आगारप्रमुख सोनवणे यांनीही तातडीने जादा एसटी बसेसची व्यवस्था केली. गटविकास अधिकारी सोनल शहा व गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनी विद्यार्थ्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांच्या त्यांच्या गावाच्या बसेसमध्ये बसवून सुरक्षित घरी पोहण्यासाठी दिलासा दिला. या कामी तहसिलदार आकाश दहाडदे यांनीही आगारप्रमुख सोनवणे यांना फोन करून शालेय विद्यार्थ्यांना सहकार्य केल्याचे गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनी सांगीतले. प्राथमिक शिक्षक बँकेचे माजी व्हाईस चेअरमन रमेश गोरे, शिक्षण विभागातील विशेष शिक्षक संतोष ढाकणे, दत्ता सुरवसे व बाळासाहेब पालवे आदींनीही विद्यार्थ्यांना ज्या त्या बसेसमधून गावी परतण्यासाठी सहकार्य केले.

## कर्जत-जामखेडला आ. रोहित पवार यांची आमसभा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** - कर्जत-जामखेड मतदारसंघातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांतील प्रलंबित तसेच सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी आमदार रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत आणि जामखेड पंचायत समित्यांच्या वार्षिक आमसभा आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये मतदारसंघातील विविध सरकारी कार्यालयांच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात येणार आहे. कर्जत पंचायत समितीची आमसभा गुरुवार दि. १८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शिवपार्वती मंगल कार्यालय, कर्जत येथे पार पडणार आहे, तर जामखेड पंचायत समितीची आमसभा शुक्रवार दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता राज लॉन्स, जामखेड येथे होणार आहे. या दोन्ही आमसभांमध्ये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात पूर्ण झालेल्या व सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार असून, २०२५-२६ या वर्षासाठी करावयाच्या नव्या योजनांचे नियोजन निश्चित केले जाणार आहे. यामध्ये ग्रामविकास, शेतीसंबंधित उपक्रम, पायाभूत सुविधा उभारणी, शिक्षण व आरोग्य सेवांचा दर्जा उंचावणे यासह सध्या सुरु असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच शासकीय कामकाजाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांचाही आढावा घेण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत झालेल्या नसल्याने या दोन्ही पंचायत समित्यांचे कामकाज प्रशासक म्हणून बीडीओ यांच्याकडे देण्यात आलेले आहे. त्यामुळे विकास कामांचा आढावा घेणे आणि प्रत्येक शासकीय कार्यालयात नागरिकांच्या अडकलेल्या कामांचा निपटारा करणे यासाठी या आमसभांना मोठे महत्त्व आहे. या आमसभेला थेट आमदार स्वतः उपस्थित राहणार असल्याने प्रशासनाकडून आमसभेची जोरदार तयारी करण्यात आली आहे. नागरिकांच्याही अडकलेल्या प्रश्नांवर या आमसभेत चर्चा होऊन ते सोडवण्यास मदत होणार आहे. या सभांमध्ये संबंधित विभागाचे अधिकारी, पंचायत समितीचे मा. सदस्य, स्थानिक पदाधिकारी व नागरिक सहभागी होणार आहेत. कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी आणि जामखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव यांनी सर्व संबंधित सदस्य, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहून रचनात्मक सूचना व मते नोंदवावीत, असे आवाहन केले आहे.

## शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे तहसील कार्यालयासमोर भजन आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयासमोर भजन आंदोलन करून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नाशिक संभाजीनगर संपर्कप्रमुख व जिल्हाध्यक्ष विनोद सिंग परदेशी, जिल्हा मुख्य सल्लागार भगवान भोगाडे, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश ठाणगे, जिल्हा उपाध्यक्ष पप्पू येवले, जिल्हा सचिव प्रकाश बेरड, जिल्हा समन्वयक विजुभाऊ भंडारे, तालुकाध्यक्ष शंकर बेरड, शेतकरी तालुकाध्यक्ष प्रवीण पिंपळे, सेल तालुका अध्यक्ष नाना पारधे, युवक जिल्हाध्यक्ष सुरज ठोकळ, युवक तालुका अध्यक्ष सागर जाधव, तालुका उपाध्यक्ष भरत कांगुर्णे, शहराध्यक्ष कृष्णा खिळे, श्रीगोंदा विधानसभा अध्यक्ष वामन भदे, श्रीगोंदा तालुका अध्यक्ष सुरेश सुपेकर, प्रसिद्धी प्रमुख जिल्हा दिव्यांग पोपट शेळके, नगर तालुका किशोर सूर्यवंशी आदीसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकारी योजनांचा लाभ त्वरित मिळावा, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, राज्य निवृत्ती वेतन योजना




यासारख्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठीची प्रक्रिया सोपी करावी व त्यांना त्वरित मदत मिळावी तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात व विधवा महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी रोजगार किंवा स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे, तसेच शेती मोजणीचे कामे त्वरित केली जावीत शेतकरी मोजणीचा अर्ज करून देखील तातडीची मोजणी लवकर उपलब्ध होत नाही त्याची प्रक्रिया सोपी करून लवकरात लवकर मोजणी व्हावी यासाठी प्रयत्न करावे तसेच शेतकरी विधवा दिव्यांग यांना न्याय मिळवून देणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्यांच्यावर आणखी मोठे संकट येऊ शकते त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, विधवा महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी योजनांचा लाभ मिळवून देणे, शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देणे या मागण्या देखील करण्यात आल्या. निवेदन स्विकारताना तहसीलदारांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. मात्र, २९ सप्टेंबरपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी यांनी दिला. या आंदोलनावेळी कार्यकर्त्यांनी कीर्तन-भजनातून शासनाचे लक्ष वेधत मागण्यांसाठी आवाज उठवला.

# साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे कोल्हापूरला शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई/ शनिशिंगणापूर** -- :-राज्यातील साखर कामगारासाठी कार्यकर्ता मेळाव्याचे शिबिर पन्हाळा किल्ला, ( कोल्हापूर) येथे तीन दिवसाचे आयोजित केले आहे. कार्यक्रमाचे उद्धाटन गुरुवार १८ सप्टेंबर रोजी देशाचे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार यांच्या शुभहस्ते होत असून कार्यक्रमाचे अध्यक्ष जयंतराव पाटील तर माजी आमदार बाळासाहेब पाटील महाराष्ट्र राज्य सहकारी कारखाना संघाचे अध्यक्ष पी आर पाटील छत्रपती साखर कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज साहेबराव जाचक दत्त कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव आप्पासाहेब पाटील हे प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, व सरचिटणीस राऊ शंकर पाटील यांनी दिली. पहिल्या सत्रात गुरुवारी दुपारी २ वाजता कॉम्रेड मिलिंद रानडे यांचे कामगार चळवळ व त्यापुढील आव्हाने, दुपारी चार वाजता भोगावती कारखान्याचे उदय मोरे यांचे साखर उद्योग आणि कामगाराची अवस्था यावर व्याख्यान होणार आहे. शुक्रवार १९ सप्टेंबर रोजी कामगार कल्याण आयुक्त रविराज ईळवे ,भोगावती कारखान्याचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील ,राजाराम बापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतीक जयवंतराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दुसऱ्या दिवसाचे सत्र सुरू होईल. यामध्ये गणेश शिंदे सर यांचे जीवन सुंदर आहे



विधिज्ञ ए. पी. चौगुले बदललेले कामगार कायदे आणि दक्षता तर विठ्ठल कोतकर यांचे समृद्धीच्या मानसिकतेतून सर्वांगीण विकास या विषयावर व्याख्यान होणार आहे.निवार २० सप्टेंबर रोजी शिबिरार्थी साखर कामगारांचे मनोगत सकाळी नऊ वाजता होईल त्यानंतर अकरा वाजता कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाशराव आबीटकर यांच्या प्रमुख उपस्थिती कुंभी कासारी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आमदार चंद्रदीप नरके, कलाप्पा आवाडे,जवाहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रकाश राव आवाडे ,पन्हाळा नगरपालिकेचे मुख्याधिकारी चेतन कुमार माळी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या सर्व संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे कार्याध्यक्ष अविनाश आपटे, राजेंद्र चव्हाण, उपाध्यक्ष डी.एम. निमसे , अशोक बिराजदार, युवराज रनवरे, नितीन बेनकर , प्रदीप शिंदे कोषाध्यक्ष प्रदीप बनगे सचिव राजेंद्र तावरे, संजय मोरबाळे , योगेश हंबीर,सयाजी कदम , संजय पाटील मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियन चे अध्यक्ष अशोकराव पवार,उपाध्यक्ष कारभारी लोडे, खजिनदार सुभाष सोनवणे सहचिटणीस भारत पटारे यांनी केले आहे.

## 'अंनिस'कडून विद्यार्थ्यांसाठी हातचलाखी व वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:** महाराष्ट्र आंदोलन समिती अहिल्या नगर जिल्हा शाखेच्या वतीने पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथील जनता विद्या मंदिर व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी हातचलाखी व वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले. सोमवार दि.१५ सप्टेंबर सकाळी ११ जनता विद्या मंदिर व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय कान्हूर पठार येथे अंनिसचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब बुधवंत यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम झालेल्या या कार्यक्रमाचे वेळी जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व कॉ.देवदत्त साळवे, मेजर सुभाष पाटील ठुबे,मेजर



संतोष ठुबे,अजित साळवे, साहेबराव गायकवाड, मुख्याध्यापक नितीन काळे व्यासपीठावर उपस्थित होते. जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व कैलास लोंढे यांनी वैज्ञानिक प्रयोग सादर केले. जिल्हाध्यक्ष बुधवंत यांनी विद्यार्थिनींसाठी 'चला निर्भय होऊया' या अनुषंगाने मुलींशी हितगुज करून मार्गदर्शन केले. मोबाईल वापराचे फायदे व तोटे याचे सविस्तर विश्लेषण केले. त्याचबरोबर यूपीएससी, एमपीएससी परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन केले. स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन करून काही अडचण अथवा शंका असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षकवृंद व विद्यालयातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी हजर होते. विद्यालयातील सर्व प्राध्यापिकांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी सहकार्य केले.

# ढोरानदीतील अतिक्रमणामुळे पुराचा धोका वाढला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :**- शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव येथील ढोरादीला आलेल्या पुराच्या पाण्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन कित्येक वर्षानंतर १२ तासाच्या ही पुढे ढोरानदीला पुलाच्या वरून पाणी असल्यामुळे वाहतूक पुर्णपणे वर्षात पावसाचे कमी जास्त प्रमाण निसर्गाचा लहरीपणामुळे अतिक्रमधारकांना सुगीचे दिवस दिसुन आले परंतु निसर्गाची लिला अपरंपार आहे या गोष्टीची दैवी प्रचिती सोमवारी दिसुन क्षणार्धात पुराच्या पाण्याने होत्याचे नव्हते केले.घाट माथ्यावर रविवारी रात्री झालेल्या जोरदार

> ढोरानदीला आलेल्या पुरात गाळपेरीत शेती करणा-या शेतक-यांची उसाचे व कपाशीचे पीक मुळासकट उपटुन वाहिले तर काही काळ नदीचा प्रवाह बदलण्यास ही नदीत झालेले अतिक्रमण महत्त्वाची बाब बनली आहे.
>
> =================
>
> ढोरानदीतील दोन्ही बाजूकडील शेतक-यांनी नदी पात्रात केलेली अतिक्रमण ही भविष्याच्या दृष्टीने महत्वाची बाब बनली असुन नदीच्या कडेला आसणा-या धनदांडग्या शेतक-यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्यामुळे भविष्यात येणा-या महापुरात नदीच्या पाण्याच्या प्रवाहाची दिशा बदलणार असुन त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन नदी खोलीकरण व रूंदीकरण या गोष्टीत लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

बंद होती महापुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून आले. ढोरादीतील अतिक्रमण मुळे भविष्यात पुराचा धोका निर्माण झाला आहे. ढोरजळगांव परिसराला वरदान ठरणा-या ढोरानदीने पाण्याची व निसर्गाची अफाट लिला सोमवारी दाखवून दिली नदीचे खोलीकरण व रुंदीकरण ही गोष्ट निसर्गालाही मान्य नाही हे प्रकर्षाने जाणवले गेल्या काही पावसामुळे सोमवारी सकाळी ढोरानदीला महापुर आला महापुरात नदीकाठच्या काही व्यावसायिकांच्या दुकाने वाहुन गेली काही घरात पाणी शिरले गायी म्हशी व शेळ्या ही वाहुन गेल्या असुन ढोरादीवरील साखळी बंधारे,स्मशानभूमी तसेच पुलांचे मोठ्या प्रमाणात पडझड झाली असुन रस्त्याला ही मोठमोठाली खड्डे पडली आहेत.तलाठी दगडे व साहाय्यक कृषि अधिकारी सविता



बडे यांनी नुकसान ग्रस्त शेतक-यांची पाहणी करून पंचनामे करण्यात आले.

# श्रीगोंद्यात दोन दुकाने फोडली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा:** पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर आज्ञात चोरट्याने तब्बल दोन दुकानाच्या शटर उचकटून दुकानात प्रवेश करत किरकोळ मुद्देमाल चोरल्याचा धक्कादायक प्रकार घडला असून या प्रकारामुळे श्रीगोंदा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे .श्रीगोंदा तालुक्यातील वेगवेगळ्या कारणांनी पोलीस ठाणे कायम चर्चेत राहिले असून लाचलुचलत विभागाच्या नित्यनियमाने होणाऱ्या कारवाया त्यात रंगेहात पकडले जाणारे कर्मचारी अश्या अनेक निर्विवाद प्रकरणामुळे पोलीस ठाणे कायम चर्चेत राहिले आहे .तसेच शहरी आणि ग्रामीण परिसरात अवैध धंद्याचा सुळसुळाट तसेच नेहमी चालू असलेल्या चोरट्यांचा धुमाकूळ सर्वश्रुत आहे .मात्र नाममात्र गुन्हे वगळता अनेक गंभीर गुन्ह्याचा तपास लावण्यात पोलिसांना अद्यापही यश आलेले नाही त्यामुळे श्रीगोंद्यात नावापुरतेच पोलीस उरलेत की काय असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होत असताना, दि १५ सप्टेंबर च्या मध्यरात्री अज्ञात चोरटयांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या बागडे कॉर्नर जवळ असणाऱ्या दोन किराणा दुकानाचे शटर उचकटून त्यातील किरकोळ मुद्देमाल चोरीला गेल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे .हि बाब नागरिकांच्या लक्षात आल्यावर नागरिकांनी याबाबत पोलीस ठाण्यातील अधिकारी कर्मचारी यांना याबाबत सविस्तर माहिती दिली .त्यावेळी घटनास्थळी पोलीस दाखल झाले मात्र रात्री घडलेला प्रकार पोलिसांना




माहित झालाच कसा नाही याबाबत परिसरातील नागरीकातून वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चेला उधाण आले होते , किरकोळ मुद्देमाल चोरीला गेल्याने कोणत्याही दुकानदाराने फिर्याद दिलेली नाही मात्र श्रीगोंदा पोलिसांच्या कामातील दिरंगाई तसेच लाचारीने डागाळलेली खाकी तसेच गुन्ह्याचा वाढता आलेख त्यातून तपासाची कासव गती यातून श्रीगोंद्यातील पोलिसांच्या कार्यक्षमतेवर नागरीकातून प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात आहे . दोन दिवसापूर्वी कर्जतमध्ये असाच प्रकार मागील दोन दिवसापूर्वी कर्जत तालुक्यात अशीच दुकाने उचकटून चोरी करण्याचा प्रयत्न केला गेला होता, त्यानंतर एक दिवसाच्या अंतर ठेवून अगदी तश्याच प्रकारे श्रीगोंद्यात चोरी करण्याचा प्रकार घडला असल्यामुळे आरोपी एकच असण्याची शक्यता नाकारता येत नाही .अशी शक्यता नाकारता येत नाही असेही नागरीकातून बोलले जात आहे.

द•ख•ल

## महिलांसाठी मोफत प्रशिक्षण वर्ग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती शहर राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महिला शहराध्यक्षा अनिता गायकवाड यांच्या वतीने बारामती शहर राष्ट्रवादी पक्ष कार्यालय शारदा प्रांगण येथे आरिवर्क, शिवणकाम तसेच फॅशन डिझाईनचा महिलांसाठी मोफत क्लास (दि:१५) रोजी पासून सुरू करण्यात आला आहे.सदर क्लास हा आरिवर्क पंधरा दिवस, फॅशन डिझाईन क्लास एक महिनाभर होणार असल्याची माहिती शहराध्यक्षा अनिता गायकवाड यांनी सांगितले. यावेळी प्रशिक्षणार्थी आशा जगताप व सुवर्णा कसबे हे असून यात रेहाना शेख, अंजुमन सय्यद, वैष्णवी गायकवाड व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.



## रमेश येवलेंकडून कडाळे कुटुंबियांना आर्थिक मदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** पहाडदरा येथील ठाकरवाडी येथे नुकतेच पावसामुळे बबन कडाळे यांचे घर कोसळले. घरामध्ये कडाळे यांचा मुलगा, सुन व तीन लहान मुले होती या घटनेत रवींद्र कडाळे, आरती कडाळे ही जखमी झाले आहेत सदर घटनेची माहिती उद्योजक शिवसेना नेते रमेश येवले यांना समजताच येवले यांनी पहाडदरा येथील कडाळे कुटुंबीयांना भेट देऊन कुटुंबाच्या उपजीविकेसाठी पन्नास हजार रूपयांची आर्थिक मदत केली व धीर दिला यावेळी रमेश येवले यांच्या समवेत शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजित चव्हाण, पहाडदरा सोसायटी चेअरमन जयदीप वीर, शिवसेना शाखाप्रमुख संदेश कुरकुटे व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



## सोमेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलचा सर्वोत्तम शाळा म्हणून सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर -** बारामती १६ सप्टेंबर : एज्युकेशन टुडे – इंडियाज प्रीमियम एज्युकेशन मॅगझिन तर्फे जाहीर करण्यात आलेल्या महाराष्ट्र स्कूल रँकिंग्स २०२५ मध्ये विद्या प्रतिष्ठान्स सोमेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज या शाळेला विद्यार्थ्यांकडे व्यक्तिगत लक्ष या विभागात सर्वोत्तम शाळा म्हणून निवडण्यात आले आहे. ही निवड शाळेच्या शैक्षणिक उत्कृष्टतेची, नाविन्यपूर्ण उपक्रमांची, नेतृत्वगुणांची तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल म्हणून करण्यात आली आहे. या निमित्ताने शाळेला महाराष्ट्र एज्युकेटर्स समिट अँड अवॉर्ड्स २०२५ या राज्यस्तरीय कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.



## सणसवाडीत विहिरीत आढळला एकाचा मृतदेह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे,** सणसवाडी (ता. शिरुर) येथील सोमनाथ देवघण हा त्याचा मित्र महेश दास याला पाहण्यासाठी त्याच्या घरी गेलेला असताना महेश घरी नसल्याने सोमनाथ हा महेशला आजूबाजूला शोधत असताना अचानक महेश हा शेजारील विहीरीमध्ये तरंगत असल्याचे दिसले, दरम्यान नागरिक व पोलिसांनी महेशला विहिरीतून बाहेर काढले असताना महेश रवी दास (वय ३५ वर्षे सध्या रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. नवतंडी ता. चौका जि. सरायकला झारखंड) याचा विहिरीत पाडून मृत्यू झाल्याचे समोर आले, याबाबत सोमनाथ सुरेश देवघण (वय ३९ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार राकेश मळेकर हे करत आहे.

## कवठे येमाई येथे बालविवाह पतीसह सासरच्यांविरोधात गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे,** कवठे येमाई येथील गांजेवाडी येथे एका चौदा वर्षीय अल्पवयीन मुलीचा बालविवाह केल्याची घटना उघडकीस आली. पोलिसांनी पिडीतेचा पती गणेश प्रल्हाद जगदाळे, सासू लता प्रल्हाद जगदाळे यांसह नणंद स्वाती संदीप पवार, मेव्हणा संदीप पवार यांच्या विरुद्ध बालविवाह सह बाललैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. कवठे येमाई (ता. शिरुर) येथील गांजेवाडी येथे राहणारी चौदा वर्षीय अल्पवयीन मुलगी असल्याचे माहिती असताना देखील गणेश जगदाळे व त्याच्या कुटुंबीयांनी तिला नेऊन महादेव मंदिरात विवाह केला. त्यानंतर तीला बुलढाणा येथे नांदायला घेऊन जाऊन याबाबत पिडीत युवतीने शिरुर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी पिडीतेचा पती गणेश प्रल्हाद जगदाळे, सासू लता प्रल्हाद जगदाळे (दोघे रा. हात्ता ता. लोहार जि. बुलढाणा) , नणंद स्वाती संदीप पवार, मेव्हणा संदीप पवार (दोघे रा. रामलिंग रोड शिरुर ता. शिरुर जि. पुणे) यांच्या विरुद्ध बालविवाहसह बाललैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार हे करत आहे.

# नगरविकास खात्याकडून पालिकेला ५ कोटींचा निधी

### महाद्वार शनि मंदिर, भक्त पुंडलिक मार्गाचा विकास होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** नगरविकास विभागामार्फत नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत आळंदी नगरपरिषदेला तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी महाद्वार ते शनि मंदिर, तेथून पुढे भक्त पुंडलिक मंदिर परिसरातील घाटकामांसाठी उपलब्ध करून देण्यात आला असून, यामुळे आळंदीतील वारकरी व भाविकांसाठी सुविधा अधिक आकर्षक आणि सुबक होणार आहेत. श्री क्षेत्र आळंदी हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीमुळे संपूर्ण देशभरातील वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. दरवर्षी लाखो भाविक येथे येऊन दर्शन घेतात. भाविकांना चांगल्या सोयी–सुविधा उपलब्ध व्हाव्यात, घाट परिसर सुशोभित व्हावा यासाठी आळंदी देवस्थान समितीने सातत्याने शासनाकडे मागणी केली होती.



अखेर या मागणीला यश आले असून शासनाने पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याचे निश्चित करण्यात आले आहे. या घाटकामांमुळे महाद्वार परिसराचा चेहरामोहरा बदलणार असून शनि मंदिर व पुंडलिक मंदिर मार्गावरील घाट अधिक सुंदर, सुरक्षित व सोयीस्कर होतील. यामुळे भाविकांच्या दृष्टीने धार्मिक वातावरणाचा अनुभव अधिक समृद्ध होईल.

आळंदी देवस्थानच्या विश्वस्त मंडळाने या निर्णयाचे स्वागत करत राज्य शासनाचे तसेच नगरविकास विभागाचे आभार मानले आहेत. भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे शहरातील रस्ते व सुविधा सुधारण्याची गरज होती. मंजूर निधीमुळे आळंदी तीर्थक्षेत्राच्या विकासाला गती मिळेल, आळंदीतील पायाभूत सोयीसुविधांचा विकास हा काळाची गरज आहे. मंजूर झालेला निधी भाविक व वारकऱ्यांच्या सोयीसाठी मोलाचा ठरेल, असे देवस्थानचे विश्वस्त हभप चैतन्य महाराज कबीरबुवा यांनी सांगितले.

## खिदमत फौंडेशनचे उपक्रम प्रेरणादायी : प्रकाश धारीवाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** खिदमत फाउंडेशनच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजनामुळे अनेक रूग्णांना मोफत आरोग्य सेवेचा लाभ मिळत असून फौंडेशनचे सामाजिक उपक्रम प्रेरणादायी असल्याचे प्रसिद्ध उद्योगपती प्रकाश धारीवाल म्हणाले.शिरूर येथील खिदमत फाउंडेशनच्यावतीने हजरत मोहंम्मद पैगंबर जयंतीनिमित्त शिरुर शहरातील नगरपरिषदेच्या मंगलकार्यालयात मोफत महाआरोग्य शिबीर व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबीराचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योगपती प्रकाश धारिवाल यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळ धारिवाल बोलत होते. यावेळी प्रसिद्ध उद्योगपती प्रकाश धारिवाल,पोलीस निरीक्षक संदेश



केंजळे,आनंद ऋषी हॉस्पिटलचे संचालक सतीश लोढा, शिरूर शहर विकास आघाडीचे अध्यक्ष ॲड.सुभाष पवार,माजी नगराध्यक्ष नसिमभाई खान,माजी उपनगराध्यक्ष जाकिरखान पठाण,माजी नगराध्यक्ष रविंद्र ढोबळे,माजी नगराध्यक्ष राजेंद्र क्षिरसागर,माजी नगरसेवक नितीन पाचर्णे,विनोद भालेराव,मंगेश खांडरे, निलेश लटांबळे,अशोक पवार,आबिद शेख,माजी नगरसेविका मायाताई गायकवाड,उषाताई वाखारे,अविनाश मल्हाव,राष्ट्रवादीचे शरद कालेवार,संतोष शितोळे, राजेंद्र लोळगे,भाजपचे मितेश गादिया,श्रीराम सेनेचे अध्यक्ष सुनील जाधव,स्वप्नील रेड्डी,प्रकाश बाफणा,प्रशांत शिंदे,प्रा.अमोल शहा,सागर नरवडे,योगेश जामदार,अजीम सय्यद,राहिल शेख,कलिम सय्यद,डॉ.परवेज बागवान,सुशांत कुंटे यांसह उपस्थित होते. खिदमत फाउंडेशनच्यावतीने नगरपरिषदेच्या मंगलकार्यालयात आयोजित मोफत महा आरोग्य शिबीर व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात आजाराविषयी मोफत सल्ला,मोफत आरोग्य तपासणी,शुगर तपासणी,मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया,इ.सी.जी,ब्लड प्रेशर व मोफत चष्मे वाटप करण्यात आले.या शिबिराचा ७०९ नागरिकांनी लाभ घेतला.शिबीराचे आयोजन खिदमत फाऊंडेशन शिरूरचे अध्यक्ष हाजी असिफ हाजी हमिद शेख, सचिव हाजी मुस्ताक हाजी उस्मान शेख,उपाध्यक्ष हाजी फारुख रजाकभाई बागवान,हाजी फिरोज बागवान, माजी नगरसेवक हाजी आबिद शेख आदीनी केले. प्रास्ताविक हाजी आसिफ शेख यांनी सूत्रसंचालन डॉ.परवेज बागवान यांनी केले तर आभार अबिद शेख यांनी मानले.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी सक्षम जाधव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर )-** राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी सक्षम राजेश जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते जाधव यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, राजेश जाधव, ओंकार जाधव, राज थोरात, गौरव गव्हाळे, अनिकेत नवगिरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार संग्राम जगताप म्हणाले की, समाज बदलासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. युवकांनी राजकारणासोबतच समाजकारणातही सक्रीय योगदान दिल्यास अनेक प्रश्न सुटू शकतात. राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून युवा कार्यकर्त्यांना समाजकारणात काम करण्याची मोठी संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर यांनी सांगितले की, आज युवक विकासाकडे अपेक्षेने पाहत आहेत. नगर जिल्ह्याचे बदलते शहरी रूप युवकांच्या डोळ्यांसमोर आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वामुळे मोठा युवा वर्ग राष्ट्रवादी काँग्रेसशी जोडला गेला आहे. समाजकारणाची तळमळ व कार्यक्षमतेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जात असल्याचे ते म्हणाले. सक्षम जाधव यांच्या संघटन कौशल्याचा व युवकांमध्ये असलेल्या जनसंपर्काचा विचार करून ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. युवकांमध्ये सक्रिय सहभाग, सामाजिक कार्य करण्याची ओढ आणि प्रामाणिक तळमळीने जाधव काम करत आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियानांतर्गत विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ या अभियानाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जेजुरी शासकीय ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जेजुरी येथील ग्रामीण रुग्णालयात विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. महिला, बालक व सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य तपासणीसाठी तसेच राष्ट्राच्या आरोग्य दृष्टीकोनात बदल घडवण्यासाठी ही शिबिरे उपयुक्त ठरणार आहेत. त्यानुसार १८ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिर, मोतीबिंदू व नेत्र तपासणी शिबिर, एएनसी कॅम्प, एनसीडी– कॅन्सर तपासणी, दंत तपासणी शिबिर, २५ सप्टेंबर रोजी एएनसी कॅम्प, एच व्ही देसाई हॉस्पिटलच्या वतीने मोतीबिंदू व नेत्र तपासणी शिबिर, एनसीडी कॅन्सर तपासणी, लसीकरण शिबिर तसेच ३० सप्टेंबर रोजी एएनसी कॅम्प, दंत तपासणी शिबिर ,१ ऑक्टोबर रोजी पुणे येथील शासकीय औंध रुग्णालयात जेजुरी ग्रामीण रुग्णालयातून संदर्भित केलेल्या रुग्णांसाठी सुपर स्पेशालिटी कॅम्प चे आयोजन केले असल्याची माहिती जेजुरी शासकीय ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रताप साळवे यांनी दिली आहे. या सर्व शिबिरांत तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विविध तपासण्या, निदान व उपचार सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. विशेषतः कॅन्सर तपासणी, दंत आरोग्य, नेत्र तपासणी तसेच महिलांच्या एएनसी तपासण्या यामुळे गावोगावी आरोग्य जनजागृती होणार आहे. ग्रामीण भागातील महिला व नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेऊन स्वतःचे आरोग्य तपासून घ्यावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ग्राहक पंचायतीच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी नितीन मिंडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** थोरांदळे (तालुका आंबेगाव) येथील नितीन मारुती मिंडे यांची ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संस्थेच्या पुणे जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे संघटन मंत्री सर्जेराव जाधव यांनी राज्य कार्यकारिणीच्या वडगाव मावळ येथील विशेष बैठकीत निवड झाली आहे यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ विजय लाड,सहसंघटिका मेधा कुलकर्णी, सचिव अरुण वाघमारे, सहसचिव एस एन पाटील कोषअध्यक्ष सुनीता राजे घाटगे, कार्यकारणी सदस्य हेमंत मराठे, पुणे विभाग अध्यक्ष अशोक अग्रवाल आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी राज्य संघटक सर्जेराव जाधव म्हणाले की, मिंडे यांनी भारतीय ग्राहक चळवळीचे प्रणेते व ग्राहक पंचायतीचे संस्थापक स्वर्गीय बिंदू माधव जोशी यांचे मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात सन २००० सालच्या दरम्यान ग्राहक पंचायत आयोजित विद्यार्थी ग्राहक प्रशिक्षण अभ्यासक्रमात बिंदू माधव जोशी यांची व्याख्यान ऐकून त्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी सुमारे १२ वर्ष बिंदू माधव जोशी यांचे सोबत ग्राहक पंचायत मध्ये गाव संघटक पदापासून कामाला सुरुवात केली होती, पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील महाविद्यालयात विद्यार्थ्यांना ग्राहक चळवळीची व्याख्याने देऊन मार्गदर्शन केले आहे,तसेच अनेक गावांमध्ये ग्राहक मार्गदर्शन मेळाव्यामध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले असून त्यांचा विज या विषयांमध्ये गाढा अभ्यास आहे, ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून त्यांना जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरही कामाचा अनुभव आहे, त्यांच्या या निवडीबाबत ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ विजय लाड यांनी विशेष अभिनंदन केले आहे.



## रस्त्याचा केक कापून वाढदिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील सोनेवाडी येथे नगदवाडी परिसरात सोनेवाडी डोऱ्हाळे रोडवर गुरसळ वस्ती नजिक असलेला खड्डा गेल्या दहा वर्षापासून तग धरून राहिला. वेळोवेळी विविध प्रशासनाकडे हा खड्डा बुजवण्याची मागणी केली मात्र याची दखल कोणीच घेतली नाही. अनेक जण या खड्ड्यात पडले मग मात्र ग्रामस्थांनी एकत्र येत या खड्ड्याचा केक कापून वाढदिवस साजरा केला. बाळासाहेब उर्फ रावसाहेब जावळे यांनी सांगितले की गेल्या अनेक दिवसापासून या रस्त्यावर अनेक खड्डे पडलेले मात्र गुरसळ वस्ती नजीक असलेला खड्डा हा जीवघेणा झालेला आहे. या रस्त्याचे काम होईल तेव्हा होईल मात्र हे खड्डे बुजवायला तातडीने सुरुवात करावी अशी मागणी त्यांनी केली.तर धनंजय माळी यांनी या रस्त्या संदर्भात वेळोवेळी मागणी करून देखील याची दखल घेतली नसल्याचे सांगितले. गांधीगिरी च मार्गाने या खड्ड्यात केक कापण्यात आला व या खड्ड्याला ग्रामस्थां कडून खूप सार्या शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी बाळासाहेब जावळे, धनंजय माळी, बाबासाहेब गुरसळ, विठ्ठल गुरसळ, सुरेश साबळे, अण्णासाहेब साबळे, रमेश साबळे, भीमराज जायपत्रे, भाऊसाहेब घोंगडे, दीपक घोंगडे अदी उपस्थित होते



# ओढ्याला पूर आल्याने युवक बुडाला

### दोन दिवसांपासून शोध मोहीम सुरूच





निमगाव म्हाळुंगी (ता.शिरूर) येथे पाण्यात युवकाचा शोध घेताना पथक.(छायाचित्र आकाश भोरडे)

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** पुणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी रविवार व सोमवार या दोन दिवस संततधार पाऊस झाल्याने अनेक ठिकाणी ओढ्या नाल्यांना पूर आलेला आहे. अशात निमगाव म्हाळुंगी येथे कामिनी ओढ्यावरून वाहणाऱ्या पाण्यात दुचाकी अडकली असताना सदर दुचाकी चालकाला मदत करताना एक युवक पाण्यातून वाहून गेल्याची घटना घडली. सुरज अशोक राजगुरु असे वाहून गेलेल्या युवकाचे नाव असून आपदा मित्र व अग्निशमन दलाकडून दोन दिवस सदर युवकाचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. नमगाव म्हाळुंगी (ता. शिरुर) येथील कामिनी ओढा येथून १५ सप्टेंबर रोजी जाणाऱ्या एक दुचाकी चालकाची दुचाकी पाण्यात अडकल्याने सुरज राजगुरू हा त्या दुचाकी चालकाला मदत करताना घसरून पाण्यात पडून वाहू लागला, याबाबतची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शंकर साळुंखे, संदीप कारंडे, आपदा मित्र वैभव निकाळजे, महेश साबळे पाटील, शेरखान शेख, अमोल कुसाळकर, शुभम वाघ, राहुल गायकवाड, पुणे महानगर विकास प्राधिकरण अग्निशमन दलाचे उमेश फाळके, प्रशांत अडसूळ, उमेश फडके, शुभम पोटे, सिद्धांत जाधव, विकास आडे, राजेश फुंदे, दिग्विजय नलावडे यांसह आदींनी सरपंच सचिन चव्हाण, उपसरपंच प्रदिप पवार, ग्रामपंचायत अधिकारी गुलाब नवले, तलाठी आबासाहेब रुके, माजी सरपंच रावसाहेब करपे, पोलीस पाटील किरण काळे यांसह आदींच्या उपस्थितीत ओढ्याच्या पाण्यात सुरजचा शोध घेतला मात्र अंधार असल्याने अपयश आल्याने रात्री उशिरा शोध मोहीम थांबवण्यात आली, त्यांनतर मंगळवार (दि.१६) सप्टेंबर रोजी सकाळी पुन्हा शोध मोहीम सुरु करण्यात आली मात्र दुपार पर्यंत सुरजला शोधण्यात अपयश आले असून आपदा मित्र व अग्निशमन दलाकडून पाण्यात बुडालेल्या सुरज अशोक राजगुरु (वय ३० वर्षे रा. निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर जि. पुणे) याचा शोध घेण्याचे काम सुरु असल्याचे पोलीस हवालदार अमोल चव्हाण यांनी सांगितले.

## द•ख•ल

# प्रा. अक्षय धालवडे सेट परीक्षा उत्तीर्ण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील प्रा. अक्षय धालवडे इंग्रजी विषयाची सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे ते आता सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी पात्र ठरले आहेत. सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रो.डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.राहुल गायकवाड , डॉ.राजेंद्र ठाकरे, डॉ. राजाराम कानडे,प्रा. रमेश थोरात आदी प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई मिळावी : घुले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**ढोरजळगांव :**-शेवगाव तालुक्यातील गावांमध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीची व पिकांच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करून तातडीने भरीव मदत मिळवी अशी मागणी क्षितीज नरेंद्र घुले यांच्यावतीने मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री ,मदत मपुनर्वसन मंत्री,कृषिमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्रे करण्यात आली आले. निवेदनात म्हटले आहे की शेवगाव तालुक्यातील सर्वच मंडळात ढगफुटी अतिवृष्टी झाली आहे रविवार दि १४ सप्टेंबर रोजी शेवगाव तालुक्यातील सर्व नाद्या ओढे नाले यांना पुर आल्याने तलाव बंधारे अती पावसाच्या पाण्यामुळे फुटले आहेत त्यामुळे अनेक गावांचा व वाड्या वस्त्याचा संपर्क तुटला असून नागरी वस्तीत पाणी शिरून नागरी जन जीवन विस्कळीत झाले आहे आणि गावात पाणी शिरल्याने गावातील घरांचे व शेतीमधील पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे अनेक पाळीव जनावरे,गायगोटे पुराच्या पाण्यात वाहून गेले आहे झालेले नुकसानीचे गांभीर्याने दखल घेऊन अतिवृष्टीचे तात्काळ सरसकट पंचनामे करून ईपिक पाहणी व पिक विम्याची अट न घालता सरसकट आर्थिक मदत मिळावी अशी मागणी करण्यात आली.

# ऑनलाइन ॲपच्या नावाखाली व्यावसायिकाला ४ लाखांचा गंडा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** ऑनलाइन ॲपच्या नावाखाली पुन्हा एकदा मोठी सायबर फसवणूक उघड झाली आहे. शहरातील एका बेकरी व्यावसायिकाला तब्बल ४ लाख ६६ हजार रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुरलीधर रंगनाथ काळे (वय ६०, रा. अहिल्यानगर) असे फसवणूक झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांनी २० जुलै रोजी दुपारी ४ वाजता 'ब्लिंकिट' या ऑनलाईन डिलिव्हरी ॲपवरून घरगुती वस्तूंची ऑर्डर केली होती. मात्र, बराच वेळ होऊनही ऑर्डर मिळाली नाही. त्यामुळे काळे यांनी गुगलवर 'ब्लिंकिट कस्टमर केअर' असा शोध घेतला. त्यात मिळालेल्या क्रमांकावर फोन केल्यानंतर एका अज्ञात व्यक्तीने स्वत:ला ग्राहक सेवा प्रतिनिधी असल्याचे सांगून त्यांच्याशी संवाद साधला. यानंतर त्या व्यक्तीने व्हॉट्सॲप कॉल करत विश्वास संपादन केला व काळे यांना स्क्रीन शेअर करण्यास प्रवृत्त केले. या प्रकारातूनच खात्यातील आर्थिक माहिती मिळवून आरोपींनी २२ जुलै रोजी संध्याकाळी ५.०२ वाजता काळे यांच्या एचडीएफसी बँक खात्यातून तब्बल ४ लाख ६६ हजार रुपये उडवले. ही रक्कम इंडियन ओव्हरसीज बँक व बँक ऑफ महाराष्ट्र या खात्यांमध्ये ट्रान्सफर केल्याचे तपासात समोर आले आहे. फसवणुकीनंतर काळे यांनी तत्काळ राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार दाखल केली. त्यानंतर तोफखाना पोलिसांकडेही त्यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केलेला पूल आकाश बाफना दुरुस्त करणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड –** जामखेड नगरपरिषद क्षेत्रातील वार्ड क्र. २ व ३ मधील मोरे वस्ती परिसरातील पुलाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यात या पुलावरून दररोज शालेय विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करतात.



पुलाच्या दोन्ही बाजूंना भेगा पडून लोखंडी सळई बाहेर आल्यामुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या धोकादायक परिस्थितीकडे प्रशासनाने अद्याप लक्ष दिले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर आदर्श फाउंडेशनचे अध्यक्ष आकाश बाफना यांनी नागरिकांच्या मागणीवर प्रत्यक्ष जाऊन पुलाची पाहणी केली.या पुलाचे काम प्रशासनाच्या अपेक्षेवर न ठेवता मी स्वतःच्या स्वखर्चातून पूर्ण करून देणार कारण हा प्रश्न थेट नागरिकांच्या जीविताशी संबंधित आहे. यावेळी येथील नागरिक ,उमेश राळेभात, नितीन राऊत, प्रशांत जगदाळे तसेच शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवकुमार डोंगरे आदी नागरिक उपस्थित होते.

# शेवगाव येथे अभियंता दिन साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अमरापुर :** कृष्णराज सागर धरण आणि इतर जलव्यवस्थापन प्रणालींच्या बांधकामात महत्त्वाची भूमिका असलेले मोक्षगुंडम विसरेश्वरा यांची १६४ जयंती शेवगांव येथील अंजिक्य लॉन येथे इनोव्हेटिव्ह डिझायईर्स ॲड इंजिनियर असोसिएशन तर्फे अभियंता दिन साजरा करण्यात आला. यावेळी तेथील अध्यक्ष अजिंक्य लव्हाट यांनी इंजिनियर पुरस्कारसाठी गटविकासअधिकारी सोनल शाह, तहसिलदार आकाश डहाडदे , शेवगांव नगरपरीषद मुख्याधिकारी विजया घाडगे यांना सन्मानित केले. यावेळी अजिंक्य लव्हाट यानी सर्व राष्टीय सन साजरे होतात.आपण अभियंता दिन साजरा केला तर पुढील काळात हे इंजिनियर मोक्षगुंडम विसवेश्वरा यांचे नाव सर्व विश्वात राहील.यावेळी भा.ज. प. जिल्हाउपाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते दिनेश लव्हाट यांनी आधुनिक काळामध्ये मधील इंजिनियर हे तांत्रिक ज्ञानासोबतच, नेतृत्व, टीमवर्क, आणि विविध क्षेत्रांतील समस्या सोडवण्यासाठी आवश्यक असलेल्या विस्तृत कौशल्यांचा उपयोग करतात. जगभरातील गुंतागुंतीच्या आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी आणि नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. यावेळी या असोसिएशन खजिनदार अभिषेक काथवटे, उपाध्यक्ष रामेश्वर खेडकर तसेच परीमल घुमरे ,सागर आधाट, आदिनाथ धावणे, आदिनाथभोसले, निलेश झिरपे, अजित धावणे,हनुमंत लव्हाट, श्रीधर म्हस्के, सतिश बोराडे, अनिकेत माने, रोहन कुसळकर,ऋषिकेश राजपुरे,अभिषेकबडे, ऋषि बडे,शशिकांत गाडेकर, रुपेश मुळे,शुभम बोडखे, बाळकृष्ण निकम, मयुर ठोंबरे, अजिक्य जाधव इ इंजिनियर. उपस्थित होते.ॲड आकाश लव्हाट यांनी आभार मानले.

# भातकुडगाव विद्यालयात मारुतराव घुले पाटील यांना अभिवादन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव:-** शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव येथील भातकुडगाव माध्य व उच्च माध्य विद्यालय भातकुडगाव येथे लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९५ व्या जयंती व विविध स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सुरेश शेरे हे होते. यावेळी बोलताना प्राचार्य सुरेश शेरे म्हणाले की लोकनेते मारुतरावजी घुले पाटील एक कर्मयोगी होते. सामान्यांची मुले शिकली तर खऱ्या अर्थाने समाजाचा विकास होईल असे ओळखुन त्यांनी जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून शिक्षणाची दारे खुली केली.शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे त्याची आर्थिक परिस्थिती सुधारली तरच भारत देश सुजलाम सुफलाम होईल या हेतूने त्यांनी जायकवाडी प्रकल्प ग्रस्थांसाठी सहकारी साखर कारखाना सुरु केला.अशा या महान व्यक्तीच्या विचार,आचरणातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाची दिशा ठरवावी. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या जयंती निमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा,रंगभरण स्पर्धा,रांगोळी



स्पर्धा,वादविवाद स्पर्धा,प्रश्नमंजुषा याबरोबरच फनी गेम विजेत्या प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य त्र्यंबक जाधव,प्राचार्य,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील करंडे व प्रदीप टाके यांनी केले तर भास्कर शिंदे यांनी आभार मानले.

# सीना नदीत सोडलेल्या मुख्य ड्रेनेज लाईनचा प्रवाह मोकळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागात पाणी साचून नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर स्टेशन रोडवरील कोठी परिसरातून जाणाऱ्या मुख्य गटार ड्रेनेज लाईनचा शेवटचा भाग सीना नदीपात्रात तुंबल्याचे निदर्शनास आले. समस्या गंभीर बनताच आमदार संग्राम जगताप यांनी आज स्वतः सीना नदीपात्रात उतरून पाहणी केली व महापालिका प्रशासनाला अत्याधुनिक सक्शन मशीनद्वारे तात्काळ स्वच्छतेच्या सूचना दिल्या. परिणामी संपूर्ण मुख्य ड्रेनेज लाईनचा प्रवाह मोकळा झाला. या पाहणीवेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, महापालिका अभियंता श्रीकांत निंबाळकर, स्वच्छता निरीक्षक ऋषिकेश भालेराव आदी उपस्थित होते. कोठी परिसरापासून सुरू झालेल्या या १२ शे एमएम व्यासाच्या मुख्य ड्रेनेज लाईनवर अनेक ठिकाणी अतिक्रमणे झालेली होती. त्यातच पावसाच्या पाण्यासोबत माती व गाळ ओढला गेल्याने लाईन वारंवार अडथळ्यांना सामोरी जात होती. हा गाळ टेल एंड म्हणजेच नदीपात्रात साचून प्रवाह पूर्णपणे रोखला गेला होता. त्यात भर म्हणजे काही अज्ञातांनी लोखंडी पुलाजवळच ट्रॅक्टरने बांधकामातील डेब्रिज टाकल्याने संपूर्ण लाईन चोकअप झाली होती. आ. जगताप यांनी या ठिकाणी उभे राहून प्रशासनाला मार्गदर्शन केले. तत्काळ सक्शन मशीनच्या साहाय्याने गाळ काढून टाकण्यात आला. यामुळे ड्रेनेजचा प्रवाह सुरळीत झाला असून कोठी, माळीवाडा, राऊत मळा, अरिहंत कॉलनी, आदर्श कॉलनी, अजय गॅस मागील परिसर, मार्केट यार्ड तसेच प्रभाग क्रमांक १३ व १४ मधील नागरिकांची पाण्याच्या तुंबल्यामुळे होणारी समस्या कायमची दूर झाली आहे. या प्रकारातून धडा घेत मनपा प्रशासनाने नदीपात्रात बांधकामाचे वेस्टेज, डेब्रिज किंवा कचरा टाकणाऱ्यांविरोधात आता कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. लोखंडी पुलाशेजारील भाग कायमस्वरूपी बंद करण्यात येणार असून कोणीही या ठिकाणी टाकाऊ वस्तू टाकल्यास दंडात्मक कायदेशीर कारवाई केली जाणार आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

# 'गझले'तून मानवी जीवनाचे रंग उलगडतात: रज्ञाक शेख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर -** गझलेतून मानवी जीवनाचे रंग उलगडतात असे प्रतिपादन श्रीरामपूर येथील ज्येष्ठ कवी , गझलकार रज्जाक शेख यांनी केले. बेलापूर येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने राष्ट्रभाषा हिंदी दिवस संपन्न झाला. शेख म्हणाले की, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ,संत एकनाथ ,संत नामदेव, संत कबीर यांनी साहित्याची सेवा केली आणि हिंदी भाषेची जडणघडण केली. हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा मिळाला. हिंदी गझल, हिंदी कविता, हिंदी चारोळी त्यांनी सादर केल्या. गझलची रचना करणे हे कौशल्य आहे. त्यामध्ये वृत्त आहे,मतला,मक्ता आहे. गझलेने सामाजिक प्रबोधन करावे .जीवन मूल्य प्रकट करावेत. प्रेमाचे सौंदर्य फुलवावे असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गुंफा कोकाटे यांनी मनोगत व्यक्त करताना त्या म्हणाल्या की, हिंदीमधील साहित्य अतिशय समृद्ध आहे. हिंदीला कबीरांचा,प्रेमचंदांचा,भारतेंदूचा वारसा आहे .हिंदी साहित्यातून मानवी मूल्यांचे संवर्धन होते असे सांगून त्यांनी राष्ट्रभाषा हिंदी दिनाच्या उपस्थितांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ.बाळासाहेब बाचकर यांनी केले तर डॉ.सुनिता पठारे यांनी आभार मानले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाच्या विद्यार्थिनी माधवी मेहेत्रे, भावना रणदिवे ,स्नेहल शिंदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व हिंदी विभागातील विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.



# मारुतराव घुले यांनी धरणग्रस्तांचे अश्रू पुसले : राजू इंगावले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा .शिक्षण संस्थेचे दहमेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव विद्यालयात लोकनेते मारुतरावजी घुले पा यांची ९५ वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजू इंगावले यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धा चे आयोजन केले होते. आज वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या यात २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला हि स्पर्धा दोन गटात पार पडली लहान गट–प्रथम भक्ती नजन द्वितीय सारीका जाधव, मोठा गट–प्रथम संचिता काटे द्वितीय साक्षी भोसले यांना शिंदे बाळासाहेब यांनी १५१रु १०१ रु रोख दोन्ही गटास बक्षीस दिले कार्यक्रमाचे अध्यक्ष होते रमेश महाराज मुराडे होते प्रमुख अतिथी नंदु भोसले व शिंदे बाळासाहेब हे होते प्रमुख अतिथी यांच्या हस्ते मारुतरावजी घुले पा. यांच्या प्रतिमेचे पूजन




करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जाधव रणजित यांनी केले वकृत्व स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी'' मालक '' याच्या कार्याविषयी माहिती विषद केली विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले लोकनेते मारुतरावजी घुले पा यांच्या कार्याविषयी सांगताना म्हटले की, घुले पा हे धरणग्रस्तांच्ये अश्रू पुसणारे नेतृत्व होते जायकवाडी धरणामुळे विस्थापित होणाऱ्या धरणग्रस्तांच्ये योग्य पुनर्वसन झाले पाहिजे . शेतकऱ्यांच्या जमीनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे त्यांच पुनर्वसन करुन त्यांच्या मुलांना नोकर्या मिळाल्या पाहिजेत .पुनर्वसित शेतकऱ्यांना सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी शासनाशी संघर्ष करुन धरणग्रताचे पुनर्वसन केले तब्येतीची काळजी न घेता गावोगावी फिरून धरणग्रताचे अश्रू पुसण्याचे काम केले जिल्हा बँकेच्या मदतीने जायकवाडी च्या पाण्यावर उपसा जलसिंचन योजना राबवून गोदाकाठी हरितक्रांती घडविली. शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष नंदु पा भोसले यांनी घुले पा जिवन कार्याविषयी माहिती दिली.सामाजिक कार्यकर्ते शिंदे बाळासाहेब यांनी घुले पा. हे एक कर्मनिष्ठ व्यक्तिमत्त्व होते या विषयी माहिती सांगितली .अध्यक्षीय भाषणात रमेश महाराज मुराडे यांनी सांगितले की ''मरावे परी किर्ती रुपी उरावे '' या उक्तीप्रमाणे घुले पा कार्य होते आज ही त्यांनी कलेले कार्य जिवंत आहे तोच वारसा विद्यार्थ्यांनी जोपासावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या वेळी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक विकास राऊत, तुपविहिरे बाळासाहेब, जाधव रणजित, बर्डे भाऊसाहेब, विशाल जोशी, विकास व्यवहारे, भरत मुराडे, आरगळे देविदास लिंभोरे गोरख, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाधव रणजित यांनी केले व आभार व्यवहारे विकास यांनी व्यक्त केले.

# शेवगाव तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अंमलबजावणीस सुरुवात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव:** तालुक्यातील ९४ ग्रामपंचायती मार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यास सुरवात झाल्याची माहिती गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी दिली या अभियाना दरम्यान सुशासन युक्त पंचायत जलसमृध्द व हरित गाव, ग्रामपंचायत आर्थीक दृष्ट्या सक्षम करणे, रोजगार हमी योजना व इतर योजनाचे अभिसरण , गाव पातळीवरील संस्था सक्षम करणे, उप जिविका विकास व सामाजिक न्याय,लोकसहभाग व श्रमदान नावीन्यपूर्ण योजना राबविणे, या वर भर देण्यात आलेला आहे. पुढे बोलताना शहा म्हणाल्या की, या बाबत प्रशासन मार्फत प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर नियोजन करण्यात येत असून सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सक्रिय सहभागातून तसेच सर्व सरपंच यांच्या मदतीने अभियान प्रभावीपणे राबविव्याची तयारी पूर्ण झाली आहे. यामध्ये गाव पातळीवरील सर्व ग्रामस्थांनी एकत्र येवून लोक सहभाग नोंदवून आदर्श ग्रामपंचायत घडवण्याचा संकल्प या अभियाणातून करावा असे आहवन शाह यांनी केलेमुख्यमंत्री पंचायात राज अंमलबजावणी व सनियंत्रण ग्रामाविकास व पंचायत राज विभागाचे मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती करणार आहे यात जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, तालुका स्तरावर गटविकास अधिकारी हे मुल्यमापण समितिचे अध्यक्ष असणार आहेत, उत्कृष्ठ काम करणाऱ्या ग्रामपंचायातच्या प्रथम, द्वितीय, तृति पुरस्कारासाठी निवड होणार आहे. पुरस्काराची रक्कमतालुका स्तर प्रथम १५ लाख रुपये, द्वितीय १२ लाख तृतीय ८ लाख जिल्हास्तर प्रथम ५० लाख, द्वितीय ३० लाख तृतीय २९ लाख विभाग स्तर प्रथम – १ कोटी द्वितीय ८० लाख तृतिय – ६० लाख तर राज्यस्तरीय प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी तृतीय २ कोटी या मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनाही या अभियानात बक्षिस असणार आहे अशी माहिती गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी दिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या हस्ते या अभियानाचा उद्घाटन सोहळा दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता होणार आहे, तरी शेवगाव तालुक्यातील सर्व ९४ ग्रामपंचायतींनी या अभियामात सहभाग नोंदवावा असे आहवन शेवगाव पंचायत समितिच्या गटविकास अधिकारी श्रीमती सोनल शहा यांना पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

# 'सीएम' सचिवालय कक्षात १हजार १८७ तक्रारी

## ४७३ अजूनही प्रलंबित : रोहिणी पवार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

> **पूर्वी नागरिकांना मुंबईला जावे लागत होते. तो त्रास टाळण्यासाठीच मुख्यमंत्री सचिवालय कक्ष सुरू झाला आहे. नागरिकांनी या कक्षाचा लाभ घ्यावा,**
>
> **– दादासाहेब गीते, निवासी उपजिल्हाधिकारी**

**अहिल्यानगर:** सामान्य नागरिकांचा आवाज थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचावा, त्यांच्या तक्रारींचा जिल्हा पातळीवर निपटारा व्हावा, प्रशासन लोकाभिमुख व पारदर्शक व्हावे, या हेतूने जिल्हाधिकारी कार्यालयात डिसेंबर २०२२ पासून मुख्यमंत्री सचिवालय कक्ष सुरू करण्यात आला. या कक्षामार्फत आतापर्यंत १हजार १८७ तक्रारी दाखल झाल्या असून त्यातील ७१४ तक्रारी निकाली निघाल्या आहेत. मात्र, तब्बल ४७३ तक्रारी अद्यापही प्रलंबित आहेत. दाखल झालेल्या तक्रारींपैकी सर्वाधिक तक्रारी या जमिनींसंबंधी आहेत. मालकी हक्क, बेकायदेशीर ताबे, नोंदणीतील अडथळे, अनधिकृत बांधकामे, जमीन मोजणीतील विसंगती अशा स्वरूपाच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर आहेत. ग्रामीण भागात जमीन हीच मुख्य संपत्ती असल्याने नागरिकांनी न्यायासाठी या कक्षाचा आधार घेतला. परंतु संबंधित विभागाकडून तातडीची कारवाई न झाल्याने या तक्रारी प्रलंबित राहत आहेत.कक्ष सुरू झाल्यानंतर डिसेंबर २०२२ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान आलेल्या तक्रारींमध्ये – जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित : ५१६, पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संबंधित : ११८, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद : १३१, महानगरपालिका आयुक्त कार्यालयाशी संबंधित : ६३, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था : ३७, इतर (संबंधित विभाग प्रमुख व अन्य प्रकरणे) : शिल्लक या सर्वांत ७१४ तक्रारींवर कारवाई झाल्याचे दाखवले जात आहे; पण ४७३ तक्रारींवर कार्यवाही अद्याप सुरू असून नागरिक अजूनही प्रतीक्षेत आहेत.मुख्यमंत्री सचिवालय कक्षाची जबाबदारी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्यावर सोपविण्यात आली आहे. कामकाज पाहण्यासाठी तहसीलदार किरण देवतरसे आणि अव्वल कारकून शेख यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांना प्राप्त अर्जांचा तत्काळ निपटारा करण्याचे आदेश दिलेले असले तरी प्रत्यक्षात अनेक अर्जांना विलंब होत आहे. पूर्वी नागरिकांना आपल्या तक्रारींसाठी थेट मुंबईतील मंत्रालयात जावे लागत होते. हा त्रास कमी करून जिल्हा पातळीवरच मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग खुला व्हावा, या उद्देशाने कक्षाची स्थापना करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्पष्ट आदेश असूनही अर्ज अनेकदा संबंधित विभागातच प्रलंबित राहतात. निपटारा करण्यासाठी ठराविक कालमर्यादा असली तरी अनेक फाईल्स महिनोन्महिने हलत नाहीत. परिणामी, नागरिकांना वारंवार कार्यालयांची पायरी चढावी लागते. 'मुख्यमंत्री सचिवालय कक्ष' स्थापनेचा हेतू लोकाभिमुख व पारदर्शक कारभार हा असला, तरी आकडेवारी स्पष्ट दाखवते की अजूनही अनेक तक्रारी धुळ खात आहेत. ११८७ अर्जांपैकी जवळजवळ अर्ध्याहून अधिक तक्रारी प्रलंबित असल्याने, नागरिकांना अपेक्षित दिलासा मिळालेला नाही. या तक्रारींचा त्वरित निपटारा झाला नाही, तर कक्षाचा हेतू केवळ कागदावरच मर्यादित राहील, अशीच नागरिकांची भावना आहे.

# गटाच्या आरक्षणाकडे इच्छुकांच्या नजरा

दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** ;- जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदासाठी आरक्षण सोडत शुक्रवारी जाहीर झाली. अडीच वर्षांसाठी अध्यक्षपद अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले. पुढील आठ ते दहा दिवसात गट आणि गणांच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमाची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. इच्छुकांच्या नजरा आता आरक्षण सोडतीकडे लागल्या आहेत. आरक्षणाचे अंदाज बांधून नेतेमंडळी फासे टाकत आहेत. श्रीगोंदा तालुक्यातील दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांना राजकीय धडे देणारी पाठशाळा म्हणून जिल्हा परिषदेची ओळख आहे. त्यामुळे नेतेमंडळींच्या बगल बच्च्यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे नेहमी आकर्षण असते. मिनी मंत्रालयाचे मैदान मारण्यासाठी इच्छुकांनी जोरात सराव सुरू केला आहे.नेतेमंडळींसमोर शक्तिप्रदर्शन करण्यात येत आहे.त्यासाठी वेगवेगळे पर्याय अवलंबले जात आहेत .मागील २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत जिल्हा परिषदेचे ६ गट होते. त्यामध्ये काष्टी, आढळगाव, मांडवगण, बेलवंडी, कोळगाव, येळपणे आदींचा समावेश आहे . त्यानंतर २०२२ मध्ये महाविकास आघाडीच्या काळात नव्याने पुनर्रचना करण्यात आली.त्यानुसार आरक्षण सोडत काढण्यात आली.मात्र महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आरक्षण सोडतीला स्थगिती देण्यात आली. पुढे न्यायालयाच्या आदेशानंतर दि. १४ जुलै२५ रोजी प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्द झाली. हरकती, सूचना घेण्यात आल्या. त्यांची सुनावणी घेऊन अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार गटाची सीमारेषा निश्चित करण्यात आली. मात्र अजूनही आरक्षण सोडत कार्यक्रमाची घोषणा झाली नाही. परिणामी आरक्षणाबाबत मत–मतांतरे व्यक्त होत आहेत.२०१७ च्या निवडणुकीचा विचार केल्यास यंदाच्या निवडणुकीत वाढलेला गट कोणत्या प्रवर्गात समाविष्ट होतो, याबाबत उत्सुकता वाढतच चालली आहे.जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची आरक्षण सोडत १२ सप्टेंबररोजी जाहीर झाली. अध्यक्षपद अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. त्यामुळे नेतेमंडळींनी त्यादृष्टीने चाचपणी सुरू केली आहे. अमूक गटात हे आरक्षण पडले तर कोणाला संधी द्यायची, हवे असलेल्या गटात मनासारखे आरक्षण निश्चित झाले नाही तर कोणत्या गटात राजकीय बेरीज करायची, याची चाचपणी सुरू झाली आहे. मात्र आरक्षण सोडत निघाल्यानंतर चित्र स्पष्ट होणार आहे. सध्या तरी महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत होणार असल्याचे स्थानिक नेतेमंडळी सांगत आहेत. मात्र बोल आघाडीचे करून डाव स्वबळाचा आखला जात आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## साई संस्थानच्या नावाने बनावट वेबसाईट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : शनिशिंगणापूर येथे बनावट वेबसाईटचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आता शिर्डी साई संस्थानच्या नावाशी साधर्म्य असलेली बनावट वेबसाईट तयार करण्यात आल्याचे समोर आले आहे. या माध्यमातून भाविकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

साई दर्शनासाठी शिर्डीत वर्षाकाठी करोडो तर दररोज हजारो भाविक येत असतात. अनेक भाविक वास्तव्यासाठी साई संस्थानच्या भक्तनिवासाला प्राधान्य देतात. असुविधा टाळण्यासाठी भाविक शक्यतो साई संस्थानच्या ऑनलाईन वेबसाईटवर जाऊन रूम बुकिंग करतात. मात्र याचाच गैरफायदा काही अपप्रवृत्तींनी घेतला असून, साई संस्थान भक्तनिवासाच्या नावाने बनावट वेबसाईट बनवण्यात आल्याचे समोर आले आहेत.मागील काही दिवसांपासून बनावट वेबसाईटच्या माध्यमातून भाविकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. कर्नाटक राज्यातील रामू जाधव या भाविकासोबत असाच फसवणुकीचा प्रकार घडला आहे. रामू जाधव यांच्या नातवाचा वाढदिवस असल्याने ते कुटुंबासह साई दर्शनाला शिर्डीकडे निघाले. त्यांच्या मुलाने वास्तव्यासाठी गुगलवर जाऊन शिर्डी भक्तनिवास सर्च केल्यानंतर साई संस्थान भक्तनिवास नावाने एक वेबसाईट निदर्शनास आली.साई संस्थानची अधिकृत वेबसाईट समजून त्याने रूम बुकिंगसाठी विचारणा केली असता त्याला व्हॉट्सॲपवर एक स्कॅनर आले. त्यावर पेमेंट केल्यानंतर संबंधिताने तुम्ही भक्त निवासाच्या काऊंटरवर आल्यावर पावती देतो असे सांगितले. मात्र ज्यावेळी जाधव कुटुंब शिर्डीत साई संस्थानच्या भक्तनिवासात पोहोचले, तेव्हा आपल्या नावे बुकिंगच नसल्याचे समजले. गोंधळलेल्या जाधव यांना साईबाबा संस्थानच्या कर्मचाऱ्यांनी धीर देत त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर साईभक्तांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला.

# नुकसानीचे पंचनामे करून त्वरित मदत द्या : ना.विखे

## करंजी, देवराईत नुकसानीची पाहणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**करंजी : येथील पुराने झालेल्या नुकसानग्रस्तांचे त्वरीत पंचनामे करुन त्यांना मदत करा असे आदेश पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनास दिले. मंगळवारी करंजी येथे नुकसानग्रस्त भागाची पहाणी ना. विखे यांनी केली यावेळी त्यांनी आदेश दिले.**




सकाळीच अकरा वाजता पाथर्डी तालुक्यातील करंजी परिसरात अतिवृष्टीने झालेल्या घरांची व शेतीची पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी जिल्हाधिकारी व इतर प्रमुख अधिकाऱ्यांसोबत पहाणी केली. अतिवृष्टीने आलेल्या पुरात करंजी येथील नदीकाठच्या अनेक कुटुंबांची घरे जमिनदोस्त झाली. या सर्व घरांची ना. विखे यांनी पहाणी करुन त्या कुटुंबातील व्यक्तीची प्रत्यक्ष भेट घेतली. पुराने नुकसानग्रस्त व पडझड झालेल्या घरांची व कुटुंबांची अवस्था पाहुन त्यांनी अधिकाऱ्यांना त्वरित पंचनाम्याचे आदेश देऊन, या नुकसानग्रस्तांना त्वरित मदत मिळेल असे आश्वासनही दिले. यावेळी ग्रामस्थांच्यावतीने ना. विखे यांना एक निवेदनही देण्यात आले. यावेळी माजी सभापती बाळासाहेब अकोलकर, विजय अकोलकर गुरुजी, सुनिल साखरे, आबासाहेब अकोलकर, राजेंद्र ज. अकोलकर, नवनाथ आरोळे, विश्वास क्षेत्रेसह गावातील अनेक मान्यवर यावेळी हजर होते. ना राधाकृष्ण यांच्या दौऱ्यात जिल्हाधिकारी पंकज आशिया, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसिलदार उध्दव नाईक तसेच इतर खात्याचे अनेक वरिष्ठ अधिकारी हजर होते.

पुराने पडझड झालेल्या घरांची ना. विखे पहाणी करीत असताना अनेक कुटुंबातील व्यक्तींशी ते बोलत असताना कुटुंबातील लोकांच्या डोळ्यातील अश्रु अनावर झाले होते. सुदैवाने आपण वाचलो असल्याचे बाबासाहेब गाडेकर यांनी ना. विखे यांना सांगितले.

## कपाशीच्या उभ्या पिकात पाणी शिरले



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, कपाशीत मोठ्या प्रमाणात पाणी शिरले असल्याने पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी यासाठी त्वरित पंचनामे करून देण्यासाठी युद्धपातळीवर यंत्रणा राबवावी तसेच नुकसानभरपाई देण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी धामोरी बहिरवाडी शिवारातील शेतकरी भाऊसाहेब येवले यांनी केली आहे.

येवले म्हणाले की, तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये ढगफुटीसारखा पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या उभ्या पिकात पाणी शिरल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. नुकसानीमुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची वाड्या-वस्त्यावरील घरे पडली आहे, गुरेढोरेही सैरभैर झाली आहे. यामुळे पालकमंत्री विखे पाटील यांनी जिल्हाधिकारी तहसीलदार, कृषी विभाग यांना आदेश करून युद्धपातळीवर त्वरित नुकसानीची पंचनामे करावेत तसेच शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देऊन दिलासा द्यावा असे साकडे येवले यांनी घातले आहे.

## दहा वर्षांपासून बेपत्ता रामनाथ शिंदे अखेर पंजाबमध्ये सापडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील रा.उस्थळ खालसा येथील रामनाथ शिंदे हे तब्बल दहा वर्षांपासून बेपत्ता होते. कुटुंबीय व गावकऱ्यांना त्यांचा कुठलाही पत्ता लागला नव्हता. मात्र, सोशल मीडियावरून अचानक दोन दिवसांपूर्वी मिळालेल्या एका व्हिडिओमुळे त्यांच्या शोधाला यश आले पंजाब मधील अमृतसर येथे रामनाथ शिंदे हे सापडले.

दि.१४ जुलै २०२५ रोजी मध्यरात्री १२.४५ वाजता सोशल मीडियावर व्हिडिओ पंजाबमधील अमृतसर येथून मेजर अण्णासाहेब कल्याण आदलिंगे (रा. अंजनगाव उमाटे, ता. माढा, जि. सोलापूर) यांनी शेअर केला होता. कामानिमित्त अमृतसरला गेलेल्या आदलिंगे यांची भेट योगायोगाने रामनाथ शिंदे यांच्याशी झाली. मराठी भाषेतून झालेल्या संवादामुळे त्यांची खरी ओळख पटली आणि मेजर आदलिंगे यांनी तत्काळ हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केला.दोन दिवसांपूर्वी



सायंकाळी हा व्हिडिओ शिंदे कुटुंबापर्यंत पोहोचताच त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. लगेचच त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर रामनाथ शिंदे आणि पुतण्या प्रकाश विठ्ठल शिंदे अमृतसरला रवाना झाले.अमृतसरसारख्या दूरच्या प्रदेशात जाऊनही मेजर आदलिंगे यांनी दाखवलेले सहकार्य उल्लेखनीय ठरले. आपल्या या सहकार्याबद्दल आम्ही जन्मोजन्मी ऋणी राहू, असे शिंदे कुटुंबाने भावुक होत सांगितले.मेजर आदलिंगे यांच्या प्रयत्नाने दहा वर्षांपासून बेपत्ता असलेले रामनाथ शिंदे हे सापडल्याने अनेकांनी मेजर आदलिंगे यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याला खऱ्या अर्थाने सॅल्युट केला.

## राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या सहभागाचा हक्क अबाधित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लखनऊ** : शालेय क्रीडा महासंघ (एसजीएफआय) या भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय मान्यताप्राप्त राष्ट्रीय क्रीडा महासंघाने आंतरराष्ट्रीय बोर्ड शाळा क्रीडा संघटना (आयबीएसएसओ) या संलग्न घटकाचे निलंबन झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सहभागाचा हक्क अबाधित राहावा म्हणून एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार एसजीएफआयने विशेष / तात्पुरती समिती गठीत केली असून ती तात्काळ कार्यरत होणार आहे.

आयहीएसएसओच्या निलंबनामुळे अनेक विद्यार्थी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. पालक, शाळा व्यवस्थापन आणि खेळाडूंकडून आलेल्या वारंवार निवेदनांचा विचार करून एसजीआयएफने ७ सप्टेंबर रोजी झालेल्या विशेष कार्यकारिणी बैठकीत हा ठराव एकमताने मंजूर केला. राष्ट्रीय क्रीडा विकास कोड २०११ व एसजीआयएफच्या संविधानानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

या समितीमार्फत विद्यार्थ्यांना थेट नोंदणी करून राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होता येईल. निलंबनामुळे राज्यस्तरीय निवड चाचण्या गमावलेल्या खेळाडूंना पारदर्शक आणि गुणवत्ताधिष्ठित पद्धतीने निवडीची संधी दिली जाणार आहे. तसेच सर्व प्रभावित शाळांना चाचण्यांच्या तारखा, स्थळे आणि आवश्यक प्रक्रिया याबाबत योग्य माहिती वेळेवर पुरवली जाणार आहे.

एसजीएफआय लवकरच एक विशेष ऑनलाइन नोंदणी पोर्टल सुरू करणार असून या पोर्टलच्या माध्यमातून आयबीएसएसओ संलग्न शाळा आपल्या खेळाडूंची थेट नोंदणी करू शकतील. यासाठी शाळांची अधिकृत यादी आणि संपर्क तपशील उपलब्ध होताच हे पोर्टल कार्यान्वित केले जाईल. समितीच्या कामकाजासाठी एसजीएपआय अध्यक्षांच्या मंजुरीने मुख्तेज सिंह बडेशा (उपाध्यक्ष), एन. आर. मुरली (कार्यकारिणी सदस्य), श्री. धिरसेन ए. सोरेंग (संयुक्त संचालक, झारखंड), पी. सी. यादव (उपसंचालक, उत्तर प्रदेश) आणि नईम अहमद (तांत्रिक सदस्य व समन्वय प्रभारी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एसजीएफआयने सर्व आयबीएसएसओ संलग्न शाळांना या समितीशी पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पालक, प्रशिक्षक व खेळाडूंनी अधिकृत सूचनांकडे लक्ष ठेवावे आणि ऑनलाइन नोंदणी पोर्टल सुरू झाल्यानंतर त्याचा उपयोग करावा असे आवाहन करण्यात आले आहे. राज्य व केंद्रशासित प्रदेशातील युनिट्सलाही आवश्यक सहकार्य करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

ही सार्वजनिक सूचना एसजीएफआयच्या संविधानानुसार, राष्ट्रीय क्रीडा विकास कोड २०११ च्या तरतुदींचे पालन करून आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा आदर राखून जारी करण्यात आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामागील एकमेव उद्देश शालेय मुलांच्या हिताचे रक्षण करणे आणि राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेचे अखंडित आयोजन सुनिश्चित करणे हाच असल्याचे एसजीएफआयतर्फे सांगण्यात आले.

## पती-पत्नीच्या वादातून पतीने केली आत्महत्त्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : पती-पत्नीचा किरकोळ कारणावरून वाद झाल्यानंतर पत्नी रागाच्या भरात घरातून बाहेर निघून गेली. या दरम्यान निराश झालेल्या पतीने ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना काल (दि. १६) सकाळच्या सुमारास उघडकीस आली. गणेश शिवाजी अदमाने (वय ३४ वर्षे, रा. समता विद्यालयजवळ, उरुळी देवाची, ता. हवेली, पुणे) असे गळफास घेतलेल्या तरूणाचे नाव आहे.

गणेश अदमाने हा गेल्या काही दिवसांपासून राहुरी तालुक्यातील गुहा परिसरात असलेल्या साई सुंदर हॉटेल येथे वेटर म्हणून काम करत होता. तसेच तो त्याची पत्नी व मुलांसह हॉटेल मागील एका खोलीत राहत होता. काल रात्रीच्या दरम्यान गणेश अदमाने याचे किरकोळ कारणावरून पत्नीशी वाद झाले होते. त्यानंतर रागाच्या भरात पत्नी घरातून बाहेर निघून गेली. तेव्हा गणेश अदमाने याने हॉटेल मागील पत्र्याच्या शेडमध्ये लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतल्याची माहिती समोर आली आहे. काल सकाळी ८ वाजता सदर घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रवीण बागुल यांनी घटनास्थळी धाव घेतली. रवींद्र देवगीरे यांनी रुग्णवाहिकेतून गणेश अदमाने यास राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला उपचारापूर्वीच मयत घोषित केले. मयत गणेश शिवाजी अदमाने याच्यामागे आई, भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. घटनेबाबत राहुरी पोलीस ठाण्यात आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पुढील तपास राहुरी पोलीस करत आहेत.

## राहुरी कृषी उत्पन्न बाजार समिती वसंतराव दादा पाटील पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राज्यात नव्हे देशात मानाचे स्थान मिळवणाऱ्या राहुरी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या शिरपेचात पुन्हा एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्यात सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या बाजार समित्यांना महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्यावतीने संघाचे संस्थापक यांच्या स्मरणार्थ मानाचा स्व. वसंतराव दादा पाटील स्मृती पुरस्कार देण्यात येत असतो. त्यानुसार राहुरी कृषि उत्पन्न बाजार समितीला नाशिक विभागात उत्कृष्ट कार्याबद्दल मानाचा स्व. वसंतराव दादा पाटील उत्कृष्ट बाजार समिती पुरस्काराने काल पुणे येथे गौरवण्यात आले.



पुणे येथे झालेल्या संघाच्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेवेळी या पुरस्कारांचे वितरण करून बाजार समितीला गौरवण्यात आले. बाजार समितीचा स्वच्छ व पारदर्शी कारभार पाहून राज्यामध्ये मोठा नावलौकिक झालेला आहे. या बाजार समितीचे नाव राज्यांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. स्वर्गीय वसंतराव दादा पाटील बाजार समिती पुरस्कार मिळण्याची ही दुसरी वेळ असून यापूर्वीही बाजार समितीचा स्वच्छ कारभार पाहून २०१८ साली राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीस या पुरस्काराने गौरवीण्यात आले होते. पुरस्कार स्वीकारताना राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व संचालक व बाजार समितीचे सचिव उपस्थित होते.

## संयुक्त अरब अमिरातीचा ओमानवर विजय

**अबुधाबी** : संयुक्त अरब अमिरातीचा कर्णधार महमद वसीम याने सोमवारी आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आशिया चषक स्पर्धेतील ओमान विरुद्धच्या सामन्यात अर्धशतकी खेळीसह त्याने टी२० मध्ये ३००० धावांचा पल्ला पार केला. त्याच्या कामगिरीमुळे संयुक्त अरब अमिरातीला ४२ धावांनी ओमानविरुद्ध विजय मिळविता आला. नाणेफेक जिंकत ओमान संघाने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना युएईच्या संघाने २० षटकांत १७२ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना ओमानचा संघ १८.४ षटकांत १३० धावा करू शकला.

टी-२० जगतात सर्वात जलदगतीने हा पल्ला गाठत त्याने इंग्लंडचा स्फोटक फलंदाज जोस बटलरला मागे टाकत नवा विश्वविक्रम महमद वसीम याने काल केला. आशिया चषक स्पर्धेतील ओमान विरुद्धच्या लढतीत कर्णधाराने जबरदस्त खेळीचा नजराणा पेश करताना १२७.७८ च्या स्ट्राईक रेटने ५४ चेंडूत ६९ धावांची दमदार खेळी केली. त्याची ही खेळी ६ चौकार आणि ३ षटकाराने बहरलेली होती. अखेरच्या षटकात धावबादच्या रुपात त्याने आपला बळी गमावला.

आंतरराष्ट्रीय टी२० मध्ये सर्वात जलदगतीने (चेंडूच्या बाबतीत) ३,००० धावांचा टप्पा पार करताना त्याने जोस बटलरला मागे टाकले. बॅटलरने १,९४७ चेंडूंचा सामना करताना हा डाव साधला आहे. याआधी हा विक्रम इंग्लंडचा स्फोटक फलंदाज जोस बटलरच्या नावे होता. त्याच्यापेक्षा १२१ चेंडू कमी खेळत मुहम्मद वसीम याने नवा वर्ल्ड रेकॉर्ड सेट केला या यादीत ॲरॉन फिंच (२,०७७ चेंडूत), डेविड वॉर्नर (२,११३ चेंडूत) आणि रोहित शर्मा (२,१४९) हे अनुक्रमे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहेत. वसीम याने ८४ डावात ३००० धावांचा पल्ला गाठला आहे. डावाचा विचार करता सर्वात जलद ३००० धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत पाकिस्तानचा मोहम्मद रिझवान हा अव्वलस्थानावर आहे. त्याने ७९ डावात ही कामगिरी केली होती. त्यापाठोपाठ बाबर आझम आणि विराट कोहलीचा नंबर लागतो.

## अपोलो टायर्स टीम इंडियाचा नवीन स्पॉन्सर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) भारतीय क्रिकेट संघासाठी नवीन जर्सी स्पॉन्सर म्हणून अपोलो टायर्सची निवड केली आहे. ड्रीम ११ सोबतचा करार रद्द केल्यानंतर बीसीसीआय नवीन स्पॉन्सरच्या शोधात होते. अपोलो टायर्सने प्रत्येक सामन्यासाठी बीसीसीआयला ४.५ कोटी रुपये देण्याचा करार केला आहे. हा करार २०२७ पर्यंत चालेल.ऑनलाइन गेमिंगवरील नवीन कायद्यामुळे ड्रीम११ ने आपला करार रद्द केला होता. यामुळे टीम इंडिया आशिया कप २०२५ मध्ये जर्सी स्पॉन्सरशिवाय मैदानात उतरली होती. बीसीसीआयने २ सप्टेंबर रोजी जर्सी स्पॉन्सरशिपसाठी निविदा काढली होती. या प्रक्रियेत कॅन्वा आणि जेके टायर्ससारख्या कंपन्यांनीही भाग घेतला होता. परंतु अपोलो टायर्सने सर्वाधिक बोली लावून ही बाजी मारली. अपोलो टायर्सचा हा करार ड्रीम ११ च्या जुन्या करारापेक्षा अधिक फायदेशीर आहे. ड्रीम ११ प्रति सामन्यासाठी ४ कोटी रुपये देत होती, तर अपोलो टायर्स ४.५ कोटी रुपये देईल. या करारामुळे अपोलो टायर्सला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी ओळख मिळेल. भारतीय क्रिकेट संघाची लोकप्रियता जगभरात असल्याने कंपनीच्या ब्रँड व्हॅल्यूमध्ये वाढ होण्याची अपेक्षा आहे. या नवीन करारामुळे भारतीय संघाच्या जर्सीवर आता अपोलो टायर्सचा लोगो दिसेल.

## सेंट्रल झोनचा ११ वर्षानंतर दुलीप ट्रॉफीवर कब्जा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बंगळुरू** : सेंट्रल झोन संघाने साऊथ झोन संघावर ६ गडी राखूनमात करत तब्बल ११ वर्षांनंतर दुलीप ट्रॉफीवर कब्जा मिळवला. कर्णधार रजत पाटीदारसाठी हे वर्ष संस्मरणीय ठरले आहे. त्याने केकेआरला आयपीएलचे विजेतेपद मिळवून दिले होते. आणि आता दुलीप चषकात नेतृत्वाचा ठसा उमटवला.

६५ धावांचे छोटे लक्ष्य सहज साध्य केले. अक्षय वाडकर (नाबाद १९, ५२ चेंडू) आणि पहिल्या डावात शतक झळकावणारा यश राठोड (नाबाद १३, १६ चेंडू) यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. पाटीदारसाठी हे वर्षातील दुसरं विजेतेपद ठरले. याआधी त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आयपीएलचे विजेतेपद मिळवून दिले होते.



पोस्ट-मॅच प्रेझेंटेशनमध्ये पाटीदार म्हणाला, प्रत्येक कर्णधाराला ट्रॉफी जिंकणं आवडते. पण आमच्या खेळाडूंनी संपूर्ण स्पर्धेत अप्रतिम जिद्द दाखवली आणि मी त्याबद्दल खूप खूश आहे. इथली विकेट थोडी कोरडी होती. त्यामुळे आम्ही आधी फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. डॅनिश आणि यशसाठी मला विशेष आनंद आहे. कारण त्यांनी संपूर्ण स्पर्धेत जबरदस्त फलंदाजी केली. सेंट्रल झोन सातव्यांदा विजेता ठरला आहे. भारतीय क्रिकेटचं केंद्र मुंबई राहिलं असून मुंबई वेस्ट झोनमध्ये येत असल्यामुळे वेस्ट झोनला दुलीप ट्रॉफीत मोठा फायदा झाला आहे. या स्पर्धेत सर्वाधिक १९ वेळा वेस्ट झोनने विजेतेपद मिळवलं आहे. सुरुवातीचे चारही हंगाम वेस्टने जिंकले होते. नॉर्थ झोन १८ वेळा विजेता ठरला आहे, तर सेंट्रल झोन आता सातव्यांदा चॅम्पियन बनला आहे. त्यामुळे आता भारतीय संघाला नवा चांगला क्रिकेटपटू मिळणार हे नक्की झाले आहे.